पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ | वर्ष : १४ | अंक : ००४ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ जुन्नर-बनकरफाटा मार्गावर भीषण अपघात

४ निरंकारी मिशनच्या वतीने आयोजित शिबिरात १७५ जणांनी केले रक्तदान

५ देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा, वादळे येतील,



पान ८ वर..

# पुणे तापले! पारा ४१.८ अंशांवर ; उन्हाच्या झळांनी नागरिक त्रस्त

## पुढील काही दिवस उष्णतेची तीव्रता वाढणार

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : शहरातील तापमान रविवारी (दि.२६) चाळिशी पार करून ४१.८ अंशावर गेले. त्यामुळे पुणेकरांच्या अंगाची लाहीलाही झाली. घरात आणि घराबाहेर पडल्यावर अंगाला उष्ण झळा झोंबत होत्या. रस्त्यावरील डांबर देखील काही भागात वितळले होते. यावरून तापमानाचा पारा चांगलाच वाढल्याचे दिसून आले. कधी काळी हिल स्टेशन' असलेले पुणे आता हॉट स्टेशन' बनले आहे.

गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरातील कमाल तापमानाचा पारा चांगलाच वाढू लागला आहे. कधी नव्हे ते शहरातील तापमान चाळिशी पार जात आहे. अन्यथा यापूर्वी हा पारा चाळिशीच्या आत नोंदवला जात होता. परंतु, गेल्या एक-दोन वर्षांमध्ये प्रचंड प्रमाणात बांधकामे



झाली, एसी आणि वाहनांची संख्या वाढली आहे. परिणामी शहरातील तापमान वाढताना दिसून येत आहे. राज्यभरात देखील तापमानाचा पारा ४५ अंशापर्यंत पोचत आहे.

रविवारी (दि.२६) शहराला उन्हाचा तडाखा बसला असून, तो अधिक तीव्र होत आहे. उष्णतेचा पारा ४१.८ अंश सेल्सिअसवर गेल्याने पुणेकरांना उन्हाच्या झळांनी नकोसे केले. शिवाजीनगरचे कमाल तापमान ४१.८ अंश नोंदवले गेले. तसेच इतर भागातील आणि जिल्ह्यातील काही गावातही हा पारा ४१ अंशावर गेला. रविवारी तर सकाळी १० वाजल्यापासूनच सूर्याचे चटके जाणवू लागले, तर दुपारच्या वेळी उन्हाच्या झळांनी अंगाची लाहीलाही झाली. रस्त्यांवरून चालताना उष्ण वारे थेट शरीराला लागत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले.

दरम्यान, शिवाजीनगरच नव्हे, तर पाषाण, चिंचवड, कोरेगाव पार्क, हडपसर आणि मगरपट्टा या भागांतही कमाल तापमानात वाढ नोंदवली आहे. वाढत्या तापमानासोबतच उकाडाही कमालीचा वाढला असून, पुणेकर घामाघूम झाले आहेत. परिणामी रविवार असूनही दुपारच्या सत्रात शहरातील मुख्य रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळाला.

शहरातील कमाल तापमान ४२ अंशापर्यंत जात असून, किमान तापमानातही वाढ झाली आहे. हडपसरमध्ये किमान तापमान २८, तर मगरपट्टा, वडगावशेरी २७ अंशावर पोचले आहे. त्यामुळे रात्री देखील प्रचंड उष्णता जाणवत आहे. ज्या भागात प्रचंड बांधकामे सुरू आहेत, त्याच भागात किमान व कमाल तापमान वाढले आहे.

# चुलत भावानेच केला गेम

## कात्रजमधील हत्येप्रकरणी चौघांना अटक

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : लग्नाची वरात, डीजेचा आवाज आणि आनंदाचं वातावरण... पण याच वरातीत नाचण्यावरून झालेलं भांडण एका तरुणाच्या जीवावर बेतलं आहे. पुण्याच्या कात्रज भागात चुलत भावाच्या लग्नात नाचण्यावरून झालेल्या वादाचा बदला घेण्यासाठी २४ वर्षीय तेजस पिलाने याची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी वेगाने तपास करत चारजणांच्या मुसक्या आवळल्या.

कात्रज सर्व्हिस रोडवर तेजस पिलाने हा तरुण रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत आढळून आला होता. त्याच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. पोलिसांनी त्याला तातडीने भारती विद्यापीठ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. तेजसच्या भावाने



दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे फिरवली.

तपासादरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, तेजसचे त्याच्याच नातेवाईकांशी काही दिवसांपूर्वी वाद झाले होते. पोलिसांनी थेट वेल्ह्याजवळील कोंढवळे गाव गाठले. तिथे धक्कादायक वास्तव समोर आले. काही दिवसांपूर्वी एका भावाच्या लग्नाची वरात निघाली होती. या वरातीत नाचण्यावरून तेजस आणि त्याचा चुलत भाऊ विशाल खोपडे यांच्यात जोरदार भांडण झाले होते. हाच राग विशालच्या मनात होता. लग्नातील त्या अपमानाचा बदला घेण्यासाठी विशालने आपल्या साथीदारांसह तेजसचा काटा काढण्याचे ठरवले. संधी मिळताच आरोपींनी तेजसवर धारदार शस्त्राने सपासप वार केले पोलिसांनी या प्रकरणात तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे पाठलाग करून चारजणांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे विशाल खोपडे (वय २२ वर्षे), अभिषेक खोपडे (वय २३ वर्षे), हरिश्चंद्र धुळे (वय ४३ वर्षे), आदिनाथ कसबे (वय १९ वर्षे) अशी आहेत.

## संक्षिप्त

### ५ रुपयांची बॉटल १० रुपयांना

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : मुंबईच्या पश्चिम रेल्वे मार्गावरील चर्चगेट ते विरार, डहाणू, पालघर, उधना आदी स्थानकांवर प्रवाशांच्या सोयीसाठी वॉटर वेंडिंग मशीन बसविण्यात आली होती. कमी दरात शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याचा उद्देश असलेल्या या योजनेतून आता प्रवाशांचीच लूट होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

वायरल झालेल्या एका व्हिडिओनुसार, बोरिवली रेल्वे स्थानकावरील वॉटर वेंडिंग केंद्रावर ठराविक दरांपेक्षा जास्त पैसे आकारले जात आहेत. संदर्भात प्रवासी अमर सावंत यांनी एक व्हिडिओ बनवून सोशल माध्यमातून व्हायरल केला आहे. नियमांनुसार एक लिटर पाण्यासाठी स्वत:ची बाटली असल्यास ५ रुपये आणि रेल्वेकडील बाटली किंवा ग्लासमध्ये घेतल्यास ८ रुपये आकारले जाणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात सर्रास १० रुपये घेतले जात असल्याचे व्हिडिओमध्ये दिसून येत आहे.

इतकेच नव्हे, अतिरिक्त पैसे घेतल्यानंतर ग्राहकांना कोणतेही बिल दिले जात नसल्याची तक्रारही प्रवाशांनी केली आहे. काही प्रवाशांनी वाद घातल्यानंतरच जादा घेतलेले दोन रुपये परत केल्याचेही या व्हिडिओत स्पष्ट दिसते. त्यामुळे प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी उभारलेल्या या केंद्रांवरच जर लूट सुरू असेल, तर रेल्वे प्रशासनचे चे नियंत्रण नेमके कुठे आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे. स्टेशन परिसरात सीसीटीव्ही, अधिकारी आणि देखरेख व्यवस्था असतानाही अशी प्रकारे उघड लूट कशी सुरू आहे, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### नवी मुंबईत मराठी शाळा बंदीचा घाट

जनप्रवास । प्रतिनिधी

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाने बहुमताच्या जोरावर इंग्रजी शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव मंजूर केला असून मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी आता शिंदेंची शिवसेना सरसावली आहे. काही झाले तरी मराठी शाळा बंद होऊ देणार नाही, अशी कठोर भूमिका घेत या निर्णयाविरोधात शिवसेनेने न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत, जर मराठी शाळा बंद करण्याचा घाट सत्ताधारी घालत असतील, तर त्याविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करु, असा इशारा शिवसेनेचे उपनेते तथा पालिकेचे विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी दिला आहे.

राज्यात भाजपसोबत सत्तेत असलेल्या महायुतीतील मित्रपक्ष शिवसेना शिंदे गट मागील काही दिवसांपासून विविध विषयांवरून आमने-सामने आला आहे. पालिका कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे करण्याच्या निर्णयानंतर नवी मुंबई भाजप-शिवसेना, विशेष करून वनमंत्री गणेश नाईक आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात खडाजंगी सुरु आहे.

# अहिल्यानगरच्या चोरट्याकडून लक्ष्मीनगर पोलसिांनी १० मोटारसायकल केल्या हस्तगत

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : येरवडा परिसरातील फेब्रुवारीमधील मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यात पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अहिल्यानगरमध्ये पाठलाग करुन चोरट्याला पकडले. त्याच्याकडून १० मोटारसायकली जप्त केल्या आहेत.

वृषभ संतोष भिसे (वय २३,रा. निबोडी, जि. अहिल्यानगर) असे या चोरट्याचे नाव आहे. त्याच्यावर अहिल्यानगरमध्ये खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा यापूर्वी दाखल आहे. येरवडा परिसरातून २० फेब्रुवारी रोजी एक मोटारसायकल चोरीला गेली होती. लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस अंमलदार सुजर ओंबासे, अतुल जाधव यांनी कोणतीही माहिती नसताना घटनास्थळ व इतर ठिकाणाचे ५० सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन तांत्रिक विश्लेषण केले. स्थानिक



बातमीदारांच्या बातमीवरुन आरोपी निष्पन्न केले. अहिल्यानगर येथील निंबोडी गावात सापळा रचला. पोलिसांना पाहून पळून जाणाऱ्या वृषभ भिसे याला पाठलाग करुन पकडले. गुन्ह्यातील मोटारसायकल जप्त केली. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने पुणे शहरातील ९ मोटारसायकल चोरीची कबुली दिली. पोलिसांनी २ लाख ८० हजार रुपयांच्या एकूण १० मोटारसायकली त्याच्याकडून जप्त केल्या आहेत.

# मराठी रिक्षाचालकांनाच परवाने द्या; अन्यथा रस्त्यावर उतरू

## अमित ठाकरे यांचा इशारा

जनप्रवास । प्रतिनिधी

पिंपरी : ज्या रिक्षा चालकांना मराठी येते किंवा जे मराठी आहेत, त्यांनाच परवाने द्यावेत. या सरकारच्या निर्णयाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. ज्यांना मराठी बोलायचे नाही, त्यांनी आपल्या शहरात परत जावे. आमचे मराठी रिक्षाचालक मुंबई आणि महाराष्ट्र चालू ठेवण्यास सक्षम आहेत. ४ तारखेच्या संपाबाबत आम्ही नंतर बोलूच, पण आमच्या अंगावर येऊ नका, अन्यथा रस्त्यावर मारू, असा इशारा मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी दिला.



पिंपरी येथे रविवारी (दि. २६) आयोजित कार्यकर्ता संवाद कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना ठाकरे यांनी मराठी अस्मितेचा मुद्दा अधोरेखित केला. यावेळी मनसेचे नेते अविनाश अभ्यंकर, अमेय खोपकर, शहराध्यक्ष सचिन चिखले आदी उपस्थित होते. अमित ठाकरे म्हणाले, मराठी माणसाच्या हक्कांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. तुम्ही अंगावर आलात नाहीत, तर आम्ही काही करणार नाही. मीडियात दिसण्यासाठी जे लोक फालतू वक्तव्ये करतात, त्यांना उत्तर देण्यात मला रस नाही.

अमित ठाकरे म्हणाले, लाडकी बहीण' योजनेबाबत न्यायालयीन निर्णयाचा उल्लेख करत निवडणुकीच्या तोंडावर या योजना सुरू केल्या आहेत. पुण्यातील पाणीटंचाई, नदी सुधार प्रकल्पासाठी होणारी वृक्षतोड यांसारख्रे स्थानिक प्रश्न आहेत. या समस्यांबाबत सत्ताधाऱ्यांनी उत्तर द्यावे.

### ड्रग्जप्रकरणी ठोस कारवाई होत नाही

अमित ठाकरे म्हणाले, ड्रग्जची वाढती समस्या चिंताजनक आहे. शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात खुलेआम ड्रग्ज विक्री होत असून, ओव्हरडोसमुळे मृत्यू होत आहेत. तरीही ठोस कारवाई किंवा गुन्हे नोंदवले जात नाहीत. पोलिसांना २४ तास फ्री हॅण्ड' देऊन राज्य ड्रग्जमुक्त करावे.

# भरधाव टँकरच्या चाकाखाली सापडून दुचाकीस्वाराचा मृत्यु

जनप्रवास । प्रतिनिधी


पुणे : थोड अंतर जाण्याऐवजी शॉटकट मारण्याच्या नादात अनेक जण उलट्या बाजूने जातात. या उलट्या जाण्यामुळे एका तरुणाला आपला जीव गमवावा लागण्याची घटना बिबवेवाडी - कोंढवा रस्त्यावर शनिवारी सकाळी घडली. भरधाव टँकरने अचानक ब्रेक दाबल्याने दुचाकीस्वार चाकाखाली सापडून त्यात त्याचा मृत्यु झाला.

अनिल सिताराम आल्हाट (वय ४५, रा. भिमाले कॉम्पेक्स, संदेशनगर) असे अपघातात मृत्यु पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. हा अपघात बिबवेवाडी - कोंढवा रोडवरील कल्याण भेळ समोर शनिवारी सकाळी साडेदहा वाजता घडला. मार्केटयार्ड पोलिसांनी टँकरचालक निलेश लक्ष्मण पोटे याला ताब्यात घेतले आहे. हा टँकर राजू अकेला वॉटर सप्लायर्स यांचा असून मगतावर रामचंद्र राठी यांच्या मालकीचा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या रस्त्यावर एक टेम्पो उलटा येत होता. त्याचवेळी पाण्याचा टँकर आणि दुचाकीस्वार जात होते. उलटा जात असलेला टेम्पो पाहून टँकरचालकाने अचानक ब्रेक मारला. त्यामुळे दुचाकीस्वार टँकरखाली सापडून त्याचा जागीच मृत्यु झाला आहे.

# बिबट्या दिसताच वाजणार सायरन; 'बेस अलार्म सिस्टम' कार्यान्वित

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : शिरूर तालुक्यातील करंदी येथे बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ व पोलिस पाटील वंदना साबळे यांनी केलेल्या



पाठपुराव्याला यश आले असून, वनविभागाने गावात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ''बेस अलार्म सिस्टम'' बसवली आहे. आता परिसरात बिबट्या दिसताच सायरन वाजणार असून, ग्रामस्थांना तातडीने सावध होता येणार आहे.

करंदी परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार बिबट्याचे दर्शन होत होते. बिबट्याने अनेकदा पशुधनावर हल्ले केले, तर काही ठिकाणी घरासमोर आणि गोठ्यांजवळ बिबट्या वावरत असल्याचे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले होते. यामुळे शेतकरी, मजूर आणि शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता. वनविभागाकडे ही यंत्रणा बसवण्याची मागणी केली होती. दरम्यान, वरिष्ठ कार्यालयाकडून निधी मंजूर होताच, धामारी रोड परिसरात ही यंत्रणा बसवण्यात आली. नुकतीच या सिस्टमची अधिकृत चाचणी घेण्यात आली. यावेळी नियतक्षेत्र वनअधिकारी सोपान अनासुने, पोलिस पाटील वंदना साबळे, आपदा मित्र महेश साबळे पाटील, राहुल ढोकले, वन्यजीव बचाव पथकाचे गणेश टिळेकर, शुभांगी टिळेकर, अमोल कुसाळकर आणि राहुल गायकवाड उपस्थित होते. ही यंत्रणा कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे. जेव्हा एखादा हिंस्र प्राणी कॅमेऱ्याच्या टप्प्यात येतो, तेव्हा ही सिस्टम त्याचे विश्लेषण करून त्वरित सायरन वाजवते. यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना किंवा वस्तीवरील नागरिकांना बिबट्या जवळ असल्याची पूर्वसूचना मिळेल. शिरूर तालुक्यात आतापर्यंत एकूण १७ ठिकाणी अशी बेस अलार्म सिस्टम बसवण्यात आली आहे.

# कोंढव्यात पूर्ववैमन्यासातून तरुणावर तीक्ष्ण हत्याराने हल्ला

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुर्ववैमन्यासातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वारकरून त्याच्या खूनाचा प्रयत्न केल्याची घटना कोंढव्यातील शिवनेरीनगर भागात शुक्रवारी रात्री ही घटना घडली. हल्यानंतर आरोपी पसार झाला.

गोविंद विनायक हाके (वय २६, रा. कोंढवा खुर्द) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी नदीम खान (वय २६, रा शिवनेरीनगर, कोंढवा खुर्द) याच्यावर खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी व तक्रारदार हे एकाच भागात राहण्यास असून त्यांच्यात यापुर्वी वादविवाद झाले होते.



याचा राग आरोपी नदीम याच्या मनात होता. शुक्रवारी रात्री साडे सातच्या सुमारास गोविंद हाके हा त्याच्या काही मित्रांसोबत शिवनेरीनगर येथील गल्ली क्रमांक ८ मध्ये गप्पा मारत थांबला होता. तेव्हा आरोपी हातात तीक्ष्ण हत्याराने त्याच्या डोक्यात वार करून त्याच्या खूनाचा प्रयत्न केला. याचा अधिक तपास कोंढवा पोलिस करत आहेत.

# आता आरटीओ अधिकारी घेणार ऑटो चालकांची मराठीची 'टेस्ट'


जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : राज्य परिवहन विभागानं येत्या एक मे पासून ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेत बोलता येणं अनिवार्य केलं आहे. त्याचा निषेध म्हणून एक तारखेला परप्रांतीय रिक्षा चालक आणि टॅक्सी चालक हे संपावर जाणार आहेत. मात्र, दुसरीकडं या निर्णयाचे मराठी ऑटो-रिक्षा चालक आणि टॅक्सी चालकांकडून स्वागत करण्यात येत आहे, तर शिवसेना शिंदे गटातील मंत्री प्रताप सरनाईक यांच्या या निर्णयाला त्यांच्याच पक्षातील नेते संजय निरुपम यांनी विरोध दर्शवला आहे. दरम्यान सर्वच रिक्षाचालकांची आरटीओकडून प्रत्यक्षात मराठीची टेस्ट घेण्यात येणार

## परप्रांतियांचं धाबं दणाणलं; संजय निरुपम चिंतेत

असल्यानं परप्रांतीय चालकांचं धाब दणाणलं आह, यासंदर्भात जीआरमध्ये केलेल्या एका उल्लेखामुळं संजय निरुपम यांनी चिंता व्यक्त केली आहे.

राज्य शासनाच्या रिक्षा चालकांना केलेल्या मराठी सक्तीबाबत निरुपम यांनी म्हटलं की, महाराष्ट्रात मराठी भाषेचा सन्मान झाला पाहिजे आणि महाराष्ट्रात जे लोक राहतात त्यांनी मराठी बोललं पाहिजे, त्यांना मराठी समजलं पाहिजे, त्यांनी मराठी भाषेत संवाद केला पाहिजे अशी आमच्या पक्षाची भूमिका आहे माझी पण तीच भूमिका आहे, पण मराठीचा आग्रह धरताना जर एखाद्याला मराठी येत आहे की नाही ते समजून घेतलं पाहिजे. टॅक्सी चालकांसाठी परिवहन विभागानं जो



काही जीआर काढला आहे, त्यानुसार किमान काम चलाऊ मराठी बोलताना आली पाहिजे, सगळ्यांसाठी हा एक चांगला विषय आहे.

पण या निर्णयाची अंमलबजावणी करताना १ मे पासून आरटीओ अधिकारी सगळ्या ऑटो चालकांना मराठी भाषा बोलता येते का? याची टेस्ट घेणार आहेत, तसंच जर ते याच्यात नापास झाले तर त्यांचं परमिट रद्द होणार आहे. त्याचबरोबर त्यांचा बॅचही जप्त केला जाईल अशी जीआरमध्ये तरतूद आहे. जीआरमधला ही एक चिंतेची बाब आहे, त्याच्यामुळं आमचे टॅक्सीवाले आणि ऑटोवाले घाबरले आहेत. त्यामुळं मी परिवहन विभागाला पत्र लिहिलं आहे की, तुम्ही मराठीचा विषय काढत आहात तर तो एक चांगला विषय आहे. तो कायम ठेवलाच पाहिजे पण तुम्ही अशा प्रकारे परमिट आणि बॅच रद्द करण्याच इशारा किंवा धमकी देऊ नका, नाहीतर लोकांसमोर उदरनिर्वाहाचं संकट निर्माण येईल त्यांची रोजीरोटी अडचणीत येईल.

याच्यासाठी माझं एक निवेदन आहे की, या सगळ्या परप्रांतिय लोकांना थोडा वेळ द्या मराठी शिकण्यासाठी. त्यानुसार मुंबईत मराठी शिकण्यासाठी एक नवीन केंद्र सुरू करण्यात येत आहे, तिकडे आम्ही सर्व परप्रांतीय रिक्षाचालकाना बोलवणार आहोत आणि त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणार आहोत.

# अग्रलेख : ट्रम्पसाहेब भारतीयांमुळेच अमेरिका मजबूत

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा आपल्या एका कृतीने जागतिक राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेतील रेडिओ होस्ट मायकेल सॅव्हेज यांचे एक पॉडकास्ट सोशल मीडियावर शेअर केले आहे. या पॉडकास्टमध्ये भारत, चीन आणि इतर काही देशांचा उल्लेख 'नरक'(हेल-होल्स) असा करत अत्यंत आक्षेपार्ह आणि वर्णद्वेषी टिप्पणी करण्यात आली आहे. अमेरिकेतील जन्मसिद्ध नागरिकत्व कायद्यात बदल करण्याच्या मागणीवरून हा नवा वाद उफाळून आला आहे. मायकेल सॅव्हेज यांनी आपल्या 'सॅव्हेज नेशन' या कार्यक्रमात दावा केला की, भारत आणि चीनमधील लोक केवळ मुलाला जन्म देण्यासाठी अमेरिकेत येतात. अमेरिकेच्या सध्याच्या कायद्यानुसार, तिथे जन्मलेले बाळ तात्काळ अमेरिकन नागरिक बनते. सॅव्हेज यांनी या स्थलांतरितांचा उल्लेख 'लॅपटॉप घेऊन फिरणारे गँगस्टर' असा केला असून, त्यांनी अमेरिकेचा अपमान केल्याचा आरोपही केला आहे. 'या लोकांनी माफिया कुटुंबापेक्षाही जास्त नुकसान अमेरिकेचे केले आहे' असे अजब तर्क सॅव्हेज यांनी या पत्रात मांडले आहेत.

सॅव्हेज यांनी केवळ देशाचाच अपमान केला नाही, तर भारतीय स्थलांतरितांवरही निशाणा साधला आहे. कॅलिफोर्नियातील हाय-टेक कंपन्यांमध्ये आता पांढऱ्या व्यक्तीला नोकरी मिळणे अशक्य झाले आहे, कारण तिथली सर्व यंत्रणा आता भारतीय आणि चिनी लोक चालवत आहेत, असे म्हणत त्यांनी नोकऱ्यांच्या मुद्यावरून विषारी टीका केली आहे. ट्रम्प यांनी ही वर्णद्वेषी पोस्ट त्यांच्या 'ट्रुथ सोशल' प्लॅटफॉर्मवर शेअर केल्याने त्याला अधिकृत पाठबळ मिळत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी जानेवारी २०२५ मध्ये दुसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर लगेचच जन्मसिद्ध नागरिकत्व बंद करण्याच्या कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली होती. ट्रम्प यांचा असा दावा आहे की, जगातील कोणत्याही देशात अशा प्रकारचा कायदा नाही. मात्र, हा दावा तांत्रिकदृष्ट्या चुकीचा आहे, कारण कॅनडा आणि मेक्सिकोसह जगातील सुमारे ३६ देशांमध्ये हा कायदा आजही अस्तित्वात आहे. सध्या हा संपूर्ण विषय अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. ट्रम्प यांनी या प्रकरणावर भाष्य करताना म्हटले की, जर न्यायालयाने आमच्या विरोधात निकाल दिला, तर त्यामुळे अमेरिकेचे केवळ आर्थिक नुकसानच होणार नाही तर देशाची प्रतिष्ठाही धुळीला मिळेल. आता न्यायालयाचा निकाल काय येतो आणि भारत-चीन सारख्या देशांबद्दल केलेल्या या विधानाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर काय पडसाद उमटतात, ते पाहणे महत्त्वाचे ठरेल.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि चीनचा उल्लेख 'नरक' असा करणाऱ्या एका पॉडकास्टला सोशल मीडियावर प्रसिद्धी दिल्यानंतर दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला होता. मात्र, हा वाद अधिक वाढू नये यासाठी अमेरिकन प्रशासनाने तातडीने हालचाली करत 'डॅमेज कंट्रोल' सुरू केले आहे. अमेरिकन दूतावासाने भारताचे कौतुक करत हा वाद शांत करण्याचा प्रयत्न केला असून, भारतानेही यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. ट्रम्प यांच्या विधानामुळे भारतात संतापाची लाट उसळल्यानंतर अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्याने परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला. 'राष्ट्राध्यक्षांनी नेहमीच म्हटले आहे की, भारत हा एक महान देश असून तिथले नेतृत्व माझे चांगले मित्र आहेत' असे स्पष्टीकरण दूतावासाने दिले. मायकेल सॅव्हेज यांच्या वर्णद्वेषी टिप्पणीमुळे निर्माण झालेला दुरावा दूर करण्यासाठी ही भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. हा संपूर्ण वाद मायकेल सॅव्हेज यांच्या पॉडकास्टमुळे सुरू झाला. यामध्ये सॅव्हेज यांनी अमेरिकेतील जन्मसिद्ध नागरिकत्व कायद्यावर टीका करताना भारतीय आणि चिनी स्थलांतरितांबद्दल अत्यंत खालच्या पातळीवर भाष्य केले होते.

स्थलांतरित लोक या कायद्याचा गैरवापर करत असल्याचे सांगताना त्यांनी भारत आणि चीनचा उल्लेख 'नरक' असा केला होता. ट्रम्प यांनी ही पोस्ट शेअर केल्याने भारतात त्याचे तीव्र पडसाद उमटले. डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यावर काही तासांतच त्यांनी बेकायदेशीर स्थलांतरितांच्या मुलांना मिळणारे जन्मसिद्ध नागरिकत्व रद्द करण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली होती. मात्र, अमेरिकेतील कनिष्ठ न्यायालयाने हा आदेश असंवैधानिक ठरवून त्याला स्थगिती दिली आहे. आता हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात असून ट्रम्प यांनी स्वत: या सुनावणीला उपस्थित राहून न्यायव्यवस्थेवर टीका केली आहे. एकीकडे अमेरिका-इराणमध्ये युद्धाचा भडका उडाला असताना डोनाल्ड ट्रम्प आपल्या वागण्याने जगातील इतर मित्र देशांचा रोष ओढवून घेत आहेत. अमेरिकेतील रेडिओ होस्ट मायकेल सॅव्हेज यांनी अमेरिकेतील जन्मजात नागरिकत्वाच्या कायद्यावर टीका करताना भारत आणि चीनचा उल्लेख 'पृथ्वीवरील नरक' असा केला होता. ट्रम्प यांनी सॅव्हेज यांचा व्हिडीओ रीपोस्ट केल्याने वादाला तोंड फुटले आहे. या प्रकरणी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान मोदींना आव्हान दिले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी कटू सत्य जगासमोर मांडले आहे. यावर आता भाजपने आणि पंतप्रधान मोदींनी पत्रकार परिषद घ्यावी आणि हा देश नरक नसून नंदनवन आहे, हे सांगावे. ट्रम्प यांची वक्तव्ये आक्षेपार्ह, अज्ञानी आणि त्यांच्या पदाला न शोभणारी आहेत. एक राष्ट्र म्हणून आपण कोण आहोत याची समज त्यांना नाही. अमेरिकेत येऊन, कठोर परिश्रम करून आपल्या देशासाठी योगदान देणाऱ्या स्थलांतरितांच्या पिढ्यांमुळे अमेरिका नेहमीच मजबूत झाली आहे, हे ट्रम्प यांना कुणीतरी सांगायला हवे.

# ट्रम्प यांच्यावरती तबब्ल ९ वेळा हल्ला



## राजकारण

व्हाईट हाऊस पुन्हा एकदा गोळीबाराच्या आवाजाने हादरलं! डिनरसाठी गेलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांना लक्ष्य करण्यासाठी एक माथेफिरू अनेक शस्त्रास्त्रांसह हॉटेलमध्ये घुसला. सीक्रेट सर्व्हिसच्या जवानांनी जीवाची बाजी लावून हा मोठा कट उधळून लावला आहे. पण ट्रम्प आणि मृत्यूचा हा खेळ नवा नाही; कधी विषारी रसायनं तर कधी थेट गोळीबार असे अनेक कटु प्रसंग त्यांनी अनुभवले आहेत. आतापर्यंत ट्रम्प यांच्यावर तब्बल नऊ वेळा हल्ले आणि हल्ल्याचे प्रयत्न झाले आहेत.

**ट्रम्प यांच्यावर झालेले यापूर्वीचे हल्ले**

२६ जुलै २०16 ओहिओ डिमेसिमा नावाचा माथेफिरू सभेत ट्रम्पवर चाल करुन गेला.१८ जून २०1६ लास वेगास हत्येचा प्रयत्न फसला,पोलिसांची बंदूक हिसकावून गोळीबाराचा होता इरादा. ५ नोव्हेंबर २०1६ रेनो,नेवादा मध्ये ट्रम्प भाषण देताना एक जण बंदूक नावाने ओरडला, ट्रम्प स्टेज सोडून गेले. ६ सप्टेंबर २०1७ मंडान, उत्तर डकोटा फोर्कलिफ्ट ट्रक ट्रम्पच्या ताफ्यात घुसवण्याचा अयशस्वी प्रयत्न. १ ऑक्टोबर २०1८. काही



पार्सलद्वारे ट्रम्प यांना विषारी रसायनांची पाकिटे पाठवली. १० ऑगस्ट २0२0. ट्रम्प यांच्या पत्रकार परिषदेपूर्वी एका सशस्त्र तरुणाला व्हाईट हाऊसबाहेरच ठार केले. १३ जुलै २०२४. बटलर, पेनसिल्वानिया जाहीर सभेतील भाषणावेळी थॉमस क्रूक्सनं झाडल्या ट्रम्पवर आठ गोळ्या,एक कानाला चाटून गेली, ट्रम्प जखमी १५ सप्टेंबर २०२४ पाम बिच, फ्लोरिडा ट्रम्प गोल्फ खेळत असलेल्या मैदानात तरुण बंदुकीसह झुडपात दडला, जवानाने गोळीबार करताच पळाला २५ एप्रिल २०२६ हॉटेल हिल्टनमध्ये डिनरसाठी गेले असता बॉलरुममध्ये गोळीबार, प्रत्युत्तरात हल्लेखोर ठार.

**शनिवारी नेमकं काय घडलं?**

**राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह**

या हल्ल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेऊन सुरक्षा दलांच्या तत्परतेचे कौतुक केले. ट्रम्प म्हणाले, हा हल्ला अनपेक्षित होता, मात्र सीक्रेट सर्व्हिसने अतिशय वेगाने कारवाई केली. एका सशस्त्र व्यक्तीने सुरक्षा चौकीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, पण आमच्या शूर जवानांनी त्याला रोखले. या घटनेत एका सुरक्षा अधिकाऱ्याला जवळून गोळी लागली, मात्र बुलेटप्रूफ जॅकेटमुळे त्याचे प्राण वाचले. ट्रम्प यांनी या घटनेचा व्हिडिओ सार्वजनिक करण्याचे आदेशही दिले आहेत. या घटनेमुळे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शनिवारी रात्री व्हाईट हाऊस वार्ताहरांच्या वार्षिक स्नेहभोजन सोहळ्याबाहेर गोळीबाराची घटना घडली. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सुरक्षित असून अमेरिकेच्या इतर वरिष्ठ नेत्यांना बॉलरूममधून बाहेर काढले. सुरक्षा अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार एका बंदूकधाऱ्याने गोळीबार केला. एका अधिकाऱ्याने माध्यमांना सांगितल्याप्रमाणे एका सुरक्षा अधिकाऱ्याला गोळी लागली, मात्र बुलेटप्रूफ जाकीट परिधान केलेले असल्याने ते सुखरुप असण्याची अपेक्षा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरक्षेच्या कारणास्तव राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, पत्नी मेलानिया ट्रम्प आणि इतर वरिष्ठ नेत्यांना तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवले. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत भारताची भूमिका स्पष्ट केली असून ट्रम्प यांच्या सुरक्षेबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

**पंतप्रधान मोदींची प्रतिक्रिया**

या घटनेवर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, फर्स्ट लेडी मेलानिया ट्रम्प आणि उपराष्ट्रपती हे वॉशिंग्टन डीसीमधील घटनेनंतर सुरक्षित आहेत, हे जाणून समाधान वाटले. मी त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देतो. लोकशाहीत हिंसेला कोणतंही स्थान नाही आणि अशा कृत्यांचा पूर्णपणे निषेध केला पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

## अंतरंग



# वाढते घटस्फोट; सामाजिक आव्हान

एकीकडे महिलांच्या आरक्षणावरून गदारोळ सुरू असताना सामान्य स्तरावर आणि त्याही



कौटुंबिक स्तरावर महिलांचे संरक्षण हा तितकाच महत्त्वाचा मुद्दा ठरतो आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये महिलांची संख्या ६७ टक्के आहे. म्हणजे पुरुष संख्येपेक्षा महिलांची संख्या वाढते आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच हे सर्वात मोठे परिवर्तन घडून आलेले आहे. आणि इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या महिलांना कुटुंबांमध्ये आणि समाजामध्ये योग्य तो सन्मान आणि आदर मिळाला पाहिजे ही अतिशय माफक अपेक्षा ठरते. दुर्दैवाने आज महिलांवरच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होते आहे. शिवाय धक्कादायक भाग म्हणजे कुटुंबांमध्ये घटस्फोटांचे प्रमाण प्रचंड वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. शहरी भागात हे प्रमाण तीस ते पस्तीस टक्क्यापर्यंत जाऊन पोहचले आहे. तर ग्रामीण भागामध्ये वीस टक्क्यापर्यंत हे प्रमाण आहे. ज्या वेगाने घटस्फोटांची संख्या वाढते आहे ते पाहिल्यानंतर कुटुंबांमध्येसुद्धा महिलांच्या सुरक्षिततेविषयी प्रचंड उदासीनता असल्याचेच म्हणावे लागते. खरे तर ही केवळ उदासीनता नसून तो सर्वात मोठा सामाजिक कलंक म्हणता येतो. आजची महिला शिकली सवरलेली आहे. तिच्याकडे असलेल्या शिक्षणाचा शिवाय इतर गुणांचा योग्य तो आदर व्हावा ही माफक अपेक्षा असते. परंतु वर्षानुवर्षांची पुरुषसत्ताक मानसिकता अजूनही महिलांना ते स्थान द्यायला तयार नाही. विशेषतः शहरी भागातले घटस्फोटांचे हे प्रमाण अत्यंत चिंताजनक ठरते. देशपातळीवर रोज शंभरावर घटस्फोटाच्या घटना घडतात. एकूणच पुढच्या पंचवीस वर्षांत घटस्फोट राष्ट्रीय समस्या म्हणूनच विचारात घ्यावी लागेल. समाजव्यवस्थेला धक्का देणारी ही बाब वेळीच विचारात घेतली पाहिजे.

आज राष्ट्रीय गुन्हे शाखेच्या अहवालाप्रमाणे संपूर्ण देशभरात महिला अत्याचारांचे प्रमाण सर्वाधिक आहे. अगदी महाराष्ट्रसुद्धा त्यात मागे नाही. संपूर्ण देशपातळीवर गेल्या तीन वर्षांत महिलांच्या हत्येच्या प्रमाणामध्येसुद्धा २६ टक्के वाढ नोंदली गेली आणि एकूण अत्याचाराच्या घटनांमध्येदेखील ३० टक्के वाढ झाल्याचे सांगितले गेले. एकीकडे अत्याचाराच्या घटनांत होत गेलेली वाढ तर दुसरीकडे कौटुंबिक पातळीवर महिलांचा होणारा छळ त्यांना दिली जाणारी दुय्यम दर्जाची वागणूक यातून काळ जरी बदलला असला तरी महिलांची सुरक्षितता अजूनही चिंताजनकच ठरलेली आहे. अत्याचाराच्या किंवा घटस्फोटांचे प्रमाण लक्षात घेतले तर महिलांचे समाजातील स्थान भक्कम करण्याच्या दिशेने अधिक ठोस पावलं पडण्याची आवश्यकता वाटू लागते. त्याची सुरुवात व्यक्तीगत किंवा कुटुंब पातळीवरून केली पाहिजे. विशेषतः चोवीस ते तीस या वयोगटात घटस्फोटांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आढळून आलेले आहे. अगदी उच्चशिक्षित असूनही समंजसपणाचा अभाव आणि एकमेकांना समजून घेऊन समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता नसल्याने हे प्रकार वाढत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. भारतासारख्या कुटुंबप्रधान व्यवस्थेला लागलेले हे मोठे गालबोट ठरते. एकमेकांमधील सुसंवाद नसल्याने आणि अतिशय क्षुल्लक कारणांवरून गैरसमज करून घेण्याचे प्रकार आणि उद्भवलेल्या परिस्थितीतून विचारपूर्वक मार्ग काढण्याची तयारी नसते. अहंकार किंवा इगो दुखावल्याने एकमेकांपासून हरकत घेण्याकडे अधिक कल दिसून येतो. यातला सर्वात वेदनादायक भाग म्हणजे घटस्फोटाच्या घटनेनंतर त्याचे सर्वाधिक परिणाम हे महिलांना भोगावे लागतात. कारण स्वतःचं करिअर सांभाळत असताना सामाजिक स्तरावर स्वतःचा योग्य तो सन्मान ठेवून घेण्यासाठीसुद्धा प्रचंड मेहनत घ्यावी लागते. विशेषतः शहरी जीवनामध्ये घटस्फोटित महिलांना अखंड सावधानता बाळगावी लागते. परिणामी तिच्या वैयक्तीक जीवनामध्ये करिअरवरोबरच स्वतःची सुरक्षितता हा मुद्दा अधिक महत्त्वपूर्ण ठरतो. खरे तर आज महिला पूर्वपिक्षा अधिक सक्षम झालेली आहे. अनेक अर्थानी तिला आत्मनिर्भरही म्हणता येईल. परंतु समाजव्यवस्थेचा विचार करीत असताना आणि आयुष्याचा प्रवास अधिक सुखकर होण्याच्यादृष्टीने तिची सुरक्षितता आणि सन्मान या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. घटस्फोटानंतरचे जीवन निश्चितच कसोटी पाहणारे असते. घटस्फोटासाठी वेगवेगळी कारणं जरी समोर येत असली तरी दोघांच्याही दृष्टीने या प्रसंगाला सामोरे जाणे कठीणच ठरते. सरकारी पातळीवरून या सामाजिक समस्येचा खूप वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची वेळ आलेली आहे. समुपदेशनापासून तर पुन्हा एकत्र येणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्यापर्यंत अनेक योजना राबवता येऊ शकतात. आज तर अनेक उच्चशिक्षित कुटुंबांमध्ये पैसा किंवा सांपत्तिक स्थिती चांगली असते. परंतु मानसिक स्तरावरचे हे ताणतणाव आणि ओढाताण समाधान मिळू देत नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. घटस्फोट ही कौटुंबिक स्तरावर जेवढी समस्या आहे तेवढेच सामाजिक स्तरावर तितकेच मोठे आव्हान ठरते.

**– अस्मिता देसाई**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ वैशाख शके संवत्- १९४८
संवत्सर – पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ
मास- वैशाख ऋतु- सौर वसंत शुक्ल पक्ष
तिथि : एकादशी १८:१६:१३ नक्षत्र : पूर्वा चैत्री २१ : १८ : २८ योग : ध्रुव २१ : ३५ : १५ करण : विष्टि १८ : १६ : १३ करण : बव (अहोरात्र) सूर्य : मेष चन्द्र : सिंह हिजरी सन् – १४४६ मुस्लिम मास – जिल्काद तारीख – ९ विशेष मोहिनी एकादशई सखाराम महाराज रथोत्सव – अमळनेर सासवड यात्रा.

## राशी भविष्य...

**मेष** – व्यापारिक वाद संपुष्टात येतील. कुटूंबात आनंदाचे वातारण येईल. साहस, पराक्रमाचा फायदा होईल. सहचरणी सोबत आर्थिक विषयांवर वाद होऊ शकतात.

**वृषभ** – सामान्य कामासाठी दिवस चांगला राहण्याची शक्यता आहे. अनिश्चितेची परिस्थिती समाप्त होईल. भागीदारीत अपेक्षित लाभाचे योग आहेत. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मिथून** – धार्मिक प्रवृत्ती वाढेल. आपल्यात असलेले गुण व योग्यता यामुळे समाजात प्रतिष्ठा वाढेल. सर्व कामे सुरळीत पार पडतील. व्यावसायीक निर्णय घेण्याची घाई करू नका.

**कर्क** – एखादे राहिलेले काम पूर्ण झाल्याने आनंद होईल. नोकरीत सहकार्याकडूंन मदत मिळेल. मुलांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवा. विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष लागेल.

**सिंह** – आर्थिक योजनांवर चर्चा होईल. स्थायी मालमत्तेची खरेदी – विक्री संभव आहे. सामाजिक कार्यात आपले योगदान राहील. व्यापारीक निर्णयात गोपनीयता बाळगा.

**कन्या** – चांगल्या मित्रांचा संपर्क फायदेशीर राहील. प्रतियोगितामध्ये आपल्याला विजय मिळेल. व्यवसायाची प्रगती होईल. मुलांच्या कामकाजावर लक्ष ठेवा.

**तूळ** – सामाजिक कामात रस वाटेल. आपला सल्ल्याला महत्व मिळेल. आरोग्याची काळजी घ्या. वाद-विवाद संपुष्टात येतील. बदली होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्य करीत असल्यामुळे मान सन्मान मिळेल.

**वृश्चिक** – नवीन संबंधाबाबत जागृत रहा. जिद्द धरू नका नुकसान होईल. साथीदाराच्या सामाजिक स्थितीची चिंता वाटेल. अजिवीका क्षेत्रात अडचणी येतील.

**धनू** – कार्यक्षमतेत वाढ झाल्याने कठिण कामात देखील यश मिळेल. शंका कुशंका निर्माण होऊ देऊ नका. व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल.

**मकर** – अथक मेहनत करुनही फळ कमी प्रमाणत मिळेल. सामान्य गोष्टींवत सुद्धा परिणामांवर ध्यान ठेवा. मानसिक अस्थिरतेमुळे कामात अडचणी येऊ शकतात. व्यापार मध्यम राहील.

**कुंभ** – एखाद्या प्रिय व्यक्तीची भेट होईल. व्यापार चांगला चालेल. भौतिक सुख, साधनांची आवड निर्माण होईल. अनावश्यक राग करू नका. यात्रा सुखात होण्याचे योग येतील.

**मीन** – नम्रता व व्यवहार कुशलता आपल्याला प्रत्येक कामात यश देईल. विरोधकांपासून सावध रहा. भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

## पारावरचा फड



स्वराज्य स्थापनेसाठी आयुष्य वेचणारे शिवराय असोत, वा स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देणारे छत्रपती संभाजीराजे असोत त्यांचे कार्य चिरंतन प्रेरणादायी आहे. परंतु दुर्दैवाने चार शतकानंतर त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्यापेक्षा त्याचे राजकारण आणि त्यातून वादंग निर्माण करणारी कृत्ये वर्षानुवर्षे सुरू आहेत. वास्तविक दोन्ही राजांचा इतिहास हा तर प्रेरणादायीपेक्षा दुर्दैवाने त्यांच्याबद्दल नको ते संदर्भ जोडून जाती-धर्मात पेटवापेटवीचे प्रकार सुरूच आहेत. मिरजेत अफजलखानाचा कोतळा काढल्याचे चित्र झळकले अन् त्यातून पेटवापेटवीने राज्यभर सत्तेचा उलटा-पुलटा खेळ झाला होता. त्यात गोरगरीबांची पोरं कोर्टाच्या येरझाऱ्या घालत राहिली. लाभार्थी मात्र निराळे राहिले. माजी राज्यपाल भगतसिंह कोशारी, राहुल सोलापूरकर ते बागेश्वरबाबांची वक्तव्ये त्यांना सवंग लोकप्रियता देणारी ठरलीत. त्या प्रकरणी त्यांच्यावर कोणती कारवाईच नाही. त्यामुळे अशा घटनांवर लोकांनी मात्र आकांड तांडव करायचे अन् विसरून जायचे. याबाबत पारावरची चर्चा!

**पांडूनाना :** आपलं छत्रपती शिवबा राजं आन् धरमवीर संभाजीराजं म्हजी जगाचा आदर्श. पर त्येंच्या नावाचा चांगला कमी आन् वादापायीच उपयेग केला जातुया.

**बाबूराव :** व्हय, आता बग न्हवं, आता नव्यानं त्ये चार दशकाआगुदरचं कॉ. पानसरेंचं पुसतक त्या आमदार संजय गायकवाडानी बगितलं आन् प्रकाशकाला धमक्या द्याय लागलं. आया-भनीवरनं.

**पांडूनाना :** व्हय, ते कमी हुतं म्हनू आता नागपुरात संगाच्या कार्यकरमात बागेशवर बाबा बरळला. म्हनं शिवबा राजानं मला राज्यकारबार नगं म्हनत रामदास स्वामीच्या पायावं मुकुट ठेवल्यालं.

**बाबूराव :** कोन ह्यो बागेशवर बाबा. त्यो परप्रांतीय, त्येला कदी इतिहासात शिवाजी महाराज, संभाजी राजं शिकिवल्यात का?

**पांडूनाना** : व्हय, मग त्यो कुटला तर संदरब काडनार आन बरळनार. पर त्येला हे बोलताना तितंच का नाही थांबविलं. काळ सोकवून देत्याती आन्...

**बाबूराव** : आक्शी बराबर, मागं बी गवरनर भगतशिंग कोशारी बी आसंच बरळलं. म्हनं संत रामदास नसतं तर शिवाजी राजास्नी कोन इचारलं आसतं म्हनं?

**पांडूनाना** : त्यो राहुल सोलापूरकर बी म्हाराजास्नी दरोडेखोर म्नहाला. त्येचं काय झालं?


**बाबूराव** : म्या तर म्हंतु आशांवं गुनं दाकल केलं पायजेत आन् जेलात बसवाय हावं.

**पांडूनाना** : पर हे करनार कोन? सत्तावाल्यास्नी आशी बुवा म्हाराज चालत्याती. त्याशिवाय चालत न्हाय.

**बाबूराव** : म्या म्हंतो ह्यामोरं राजं आसुद्या, न्हायतर लोकपुरुष नाव चांगलं घ्या न्हायतर घ्याचं न्हाय.

**पांडूनाना** : तसा कायदाच व्हावा! – **अमृत चौगुले**


## उपदेश कथा



**वेळेची किंमत**

एक फार मार्मिक कथा आहे. ग्रॅहम बेल यांच्या दुकानात पुस्तकाच्या दुकानात एकदा एक ग्राहक आला.त्याला एक पुस्तक खरेदी करायचे होते. बेल यांनी दुकानात एक पाटी लावली होती.' एकच किंमत',गिऱ्हाईकाने पुस्तक निवडले आणि किंमत विचारली,बेलने सांगितले.'दोन डॉलर'. गिऱ्हाईकाने विचारले.काही कमी नाही करणार का? बेलने काही न बोलता पाटीकडे बोट दाखवले! पण तो ग्राहक पुन्हा म्हणाला,अहो,दहा टक्के सूट तर सर्वच दुकानदार देतात.तुम्ही पुस्तक कितीला देणार ते सांगा! बेल म्हणाला, 'आता या पुस्तकाची किंमत आहे दोन डॉलर आणि दहा सेंट.' गिऱ्हाईक आश्चर्याने म्हणाले,'अहो आताच तुम्ही दोन डॉलर म्हणालात,लगेच वाढली कशी? ग्रॅहम बेल म्हणाले,'मित्रा,दोन डॉलर ही या पुस्तकाची किंमत आहे आणि दहा सेंट ही तू माझ्या घेतलेल्या दोन मिनिटांची किंमत आहेर तू अजून उशीर लावशील तर पुस्तकांची किंमत आणखी वाढत जाईल!' त्या ग्राहकाने निमूटपणे वाढलेली किंमत दिली आणि पुस्तक घेऊन बाहेर पडला!

## दिनविशेष...



**अंतरराष्ट्रीय**

११२४ – डेव्हिड पहिला स्कॉटलंडच्या राजेपदी.

१२९६ – डनबारची लढाई – एडवर्ड पहिल्याने स्कॉटलंडचा पराभव केला.

१५०९ – पोप ज्युलियस दुसऱ्याने व्हेनिसला वाळीत टाकले.

१५२१ – माक्टानची लढाई – पृथ्वीप्रदक्षिणा करणारा फर्डिनांड मॅगेलन फिलिपाईन्समध्ये स्थानिक रहिवाश्यांशी लढताना मृत्युमुखी.

१७७३ – भारतातील युद्धांच्या खर्चामुळे डबघाईला आलेल्या ब्रिटीश ईस्ट ईंडिया कंपनीला वाचवण्यासाठी ब्रिटीश संसदेने टी ऍक्ट करून कंपनीला उत्तर अमेरिकेशी व्यापार करण्याचा मक्ता दिला.

१८१३ – १८१२चे युद्ध – अमेरिकेने कॅनडातील ऑन्टारियो प्रांताची राजधानी यॉर्क(आताचे टोरोन्टो शहर) काबीज केली.

१८६१ – अब्राहम लिंकनने अमेरिकेत हेबिअस कोर्पसचा मूलभूत हक्क निलंबित केला.

# रस्ते सुसाट अपघात अफाट

देशासह राज्यात रस्ते निर्मितीचा वेग प्रचंड आहे. राज्यात झालेला मुंबई-नागपूर हिंदूहदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी मार्ग तसेच इतर नव्याने सुरू असलेल्या किंबहुना पूर्ण झालेल्या राष्ट्रीय मार्गामुळे वाहनांचा वेग प्रचंड आहे. त्यामुळे अपघात हा नित्याचाच प्रकार होऊन बसलेला आहे. यावर उपाययोजना सुचविताना महामार्गाच्या मुख्य मार्गिकेवर आणि बाजूच्या पट्ट्यांवर अवजड वाहनांना उभे राहण्यास किंवा पार्किंग करण्यास मज्ञाव करताना न्यायालयाने रस्ते सुरक्षेचा प्रश्न हा थेट राज्यघटनेच्या कलम २१ मधील 'जगण्याच्या अधिकाराशी' जोडलेला असल्याचे स्पष्ट केले. देशात दरवर्षी सकल देशांतर्गत उत्पादनाच्या अंदाजे तीन टक्के इतके प्रचंड नुकसान केवळ रस्ते अपघातांमुळे होत आहे. मृतांमध्ये सर्वाधिक संख्या १८ ते ४५ वयोगटातील तरुणांची असणे ही अधिक गंभीर बाब आहे. रस्ते अपघातांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास या समस्येची भीषणता स्पष्ट होते. २०२४ या वर्षात राष्ट्रीय महामार्गांवर सुमारे ५४,४४३ ते ५७,४८२ अपघाती मृत्यूंची नोंद झाली आहे. याचा अर्थ दररोज सरासरी १५० हून अधिक नागरिक महामार्गावरील अपघातांत आपला जीव गमावतात. त्यामुळे एकीकडे रस्त्यामुळे विकास होत असल्याचे सांगितले जात असले तरी दुसरीकडे जीवित मात्र धोक्यात येताना दिसते आहे.

## जन की बात...



# आर्द्रतेमुळे उष्णतेचा कहर



सामान्यतः भारतात तापमानाच्या ठराविक श्रेणींवर किंवा निर्धारित मानकांतील वाढीवरून उष्णतेची लाट घोषित केली जाते. मात्र, या पारंपरिक मोजमापांमध्ये आर्द्रतेचा पुरेसा विचार केला जात नाही. प्रत्यक्षात आर्द्रतेमुळे उष्णतेची जाणीव अधिक तीव्र होते आणि त्यामुळे मानवी अस्वस्थता लक्षणीयरीत्या वाढते. दिल्ली आणि विदर्भासह देशातील अनेक भागांमध्ये उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे जनजीवन होरपळत असताना, भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) उष्णतेच्या परिणामांचे अधिक अचूक मूल्यांकन करण्यासाठी प्रायोगिक उष्णता निर्देशांक सादर केला आहे. हा निर्देशांक केवळ तापमानावर आधारित नसून त्यात आर्द्रतेचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात जाणवणाऱ्या उष्णतेचे अधिक वास्तव चित्र समोर येत आहे. म्हणजेच, आपण आतापर्यंत जाणवत असलेल्या उष्णतेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात आपले शरीर उष्णता नकळत झेलत होते आणि झेलत आहे. राजधानी दिल्ली या वर्षातील उष्णतेच्या लाटेचा पहिला प्रकोप झेलत असून, सकाळी ८ वाजल्यापासूनच उन्हाचा कडाका असह्य होत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे दिल्लीसह २४ शहरांमध्ये कमाल तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. राजस्थानमधील श्रीगंगानगर येथे सर्वाधिक ४४.५ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले असून, प्रयागराज (उत्तर प्रदेश) आणि अमरावती (महाराष्ट्र) यांचाही या उच्च तापमानात समावेश आहे. त्यामुळे केवळ जागतिक तापमानच नव्हे, तर देशाचे तापमानही वाढत आहे. वाढते तापमान हे मानव आणि पर्यावरण या दोन्हींसाठी गंभीर समस्या निर्माण करत आहे.

# तेलंगणा सरकारचा थकीत पेन्शनचा निर्णय स्तुत्य

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवन्थ रेड्डी यांनी एक



ऐतिहासिक व लोकोपयोगी निर्णयाची मंत्रिमंडळात मंजुरी दिली आहे. गेली सुमारे दहा वर्षे तेथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन इत्यादी सुविधा मिळालेल्या नाहीत. ही रक्कम सरकारकडे पडून आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्त कर्मचारी अनेक हेलपाटे मंत्रालयात व विविध सरकारी कार्यालयात मारत होते येत्या शंभर दिवसात ही रक्कम त्यांना दिली जाणार आहे. राज्यातील सर्व मंत्री, राज्यमंत्री, आमदार यांच्या पगारातून कपात करून ही रक्कम दिली जाणार आहे. ही बातमी नुकतीच वाचली अनेक मंत्री व आमदार कोट्यधीश आहेत. त्यामुळे काही दिवस ५० टक्के पगार कापल्यामुळे त्यांचे फारसे नुकसान होणार नाही. या निर्णयामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी सरकारला धन्यवाद दिले आहेत तेलंगणा सरकारचा हा निर्णय योग्य असून त्याचे स्वागत होत आहे, तेलंगणा सरकारच्या या निर्णयाचे अनुकरण देशातील अन्य नागरिकांनी केले तर बंद, संप अशा प्रकारांना आळा बसेल.

# जुन्नरचे नायब तहसीलदार अनंता गवारी यांचा अपघाती मृत्यू

## जुन्नर-बनकरफाटा मार्गावर भीषण अपघात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** हायवा आणि कारची जोरदार धडक होऊन,झालेल्या अपघातात जुन्नर तहसीलचे निवडणूक नायब तहसीलदार अनंता बनाजी गवारी वय ५२ वर्षे, यांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर दोघेजण जखमी झाले हा अपघात शनिवारी दि.२५ रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या समस सुमारास जुन्नर बनकरफाटा रोडवर झाला.






याबाबत मिळालेली माहिती अशी की,शनिवारी जुन्नर-बनकर फाटा रोडवर हायवा क्र. एम एच १४ केयू ०८१२ हा जुन्नरहून बनकर फाट्याकडे येत असताना, बनकर फाट्याकडून जुन्नर कडे जाणारी होंडा सीटी कार एमएच १२ एफएफ ६४२३ ची दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारा पांगरी माथा ते गणपती फाटा दरम्यान या दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात नायब तहसीलदार अनंता बनाजी गवारी वय ५२, विजय खारतोडे वय ४८ हे गंभीर जखमी झाले असून, तुषार भीमराव कोरडे वय ३५, सर्व रा.जुन्नर यांना किरकोळ दुखापत झाली आहे. जखमींवर ओतूर येथील एका खासगी रूग्णालयात प्राथमिक उपचार केले.दरम्यान या अपघातात अनंता गवारी आणि विजय खारतोडे यांना गंभीर दुखापत झाल्याने,त्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथे पाठवण्यात आले होते.दरम्यान नायब तहसीलदार अनंता गवारी यांचे वाटेतच निधन झाले.तर विजय खारतोडे यांच्यावर पुणे येथील रूग्णालयात उपचार सुरू असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान खारतोडे यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सूत्रांनी दिली.

अपघाताची माहिती मिळाताच ओतूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, पोलिस हवालदार नामदेव बांबळे, किशोर बर्डे, ट्रॅफिक वार्डन शुभम काशीद व अमोल मडके यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.

## महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मेंदूविकार, अस्थिरोग, कॅन्सरवरील उपचार देण्याचा मानस : प्रकाश आबिटकर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेप्रमाणेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मेंदूविकार,अस्थिरोग आणि कर्करोगसारख्या गंभीर आजारांवर जनसामान्यांसाठी उपचार उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याची घोषणा राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज केली.




भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या ३१ व्या स्थापना दिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राज्याचे अपारंपरिक ऊर्जा व दुग्धविकास, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री अतुल सावे, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, यावेळी उपस्थित होते.

भारती हॉस्पिटल येथील नूतनीकरण केलेल्या एकत्रित महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे कार्यालय, अत्याधुनिक नेत्ररोग विभाग व नेत्रपेढी तसेच आय. व्ही. एफ. केंद्राचे उद्घाटन आणि विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्री.आबिटकर म्हणाले, दर्जेदार शिक्षणातून गुणवत्ता जपत समाज घडविण्याचे कार्य भारती विद्यापीठामार्फत घडत आहे. श्री.सावे म्हणाले, छत्रपती संभाजीनगरचा विकास झपाट्याने होत असून एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक उद्योग व्यवसायात होणार आहे. अशा वेळी कुशल, अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर असणार आहे. तसेच आरोग्य व्यवस्थेचीही मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. भारती विद्यापीठाने छत्रपती संभाजीनगरमध्ये शैक्षणिक तसेच आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असेही श्री. सावे म्हणाले.

डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, भारती विद्यापीठाचे लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे भव्य शैक्षणिक संकुल उभे राहणार असून पुण्यात भव्य क्रीडासंकुल उभारण्यात येणार आहे, असेही श्री. कदम म्हणाले.

डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले, शिक्षणात तंत्रज्ञान हे सहाय्यक साधन आहे, पर्याय नाही. शिक्षणामध्ये मानवीमूल्य, नैतिकता आणि संवेदनशीलता टिकवून ठेवणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

## त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीसाठी २८ एप्रिल रोजी महापौर यांच्या हस्ते भूमिपूजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मरणार्थ भव्य सृष्टी उभारण्यात येणार आहे. पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरातील मोकळ्या जागेत ही सृष्टी साकारली जाणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन मंगळवार, २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. याशिवाय विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे. तर आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर मांडेकर, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याशिवाय प्रमुख अतिथी म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ.भीमराव आंबेडकर यांची देखील उपस्थिती असणार आहे.

यांच्यासह महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य अँड. गोरक्ष लोखंडे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे तसेच नगरसदस्य सिद्धार्थ बनसोडे, राहुल भोसले, कुशाग्र कदम, तुषार हिंगे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, डॉ. वैशाली घोडेकर (लोंढे), सारिका मासुळकर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे तसेच नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी हे देखील या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत.

## केडगावच्या मनोरमा मेमोरियल शाळेचा गुणवत्ता संवर्धन अभियानात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**केडगाव :** पुणे जिल्हा परिषद आणि पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'गुणवत्ता संवर्धन अभियान' स्पर्धेत केडगाव येथील पंडिता रमाबाई मुक्ती मिशन संचलित 'मनोरमा मेमोरियल हायस्कूल व जुनिअर कॉलेज'ने बाजी मारली आहे. इयत्ता पाचवी ते बारावी गटात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावून शाळेने यशाचे नवे शिखर गाठले आहे.



या यशाची विशेष दखल म्हणजे, पंडिता रमाबाई यांच्या १६८ व्या जयंतीदिनीच शाळेला हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला. या योगायोगामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, केडगाव परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

शाळेच्या या यशाबद्दल आयोजित विशेष पारितोषिक वितरण सोहळ्यात पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते शाळेला गौरविण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांचे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचे विशेष कौतुक केले.

शाळेच्या या यशाचे श्रेय मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना तसेच विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला जाते. या यशाबद्दल शाळेच्या विश्वस्त मंडळाने आणि संचालक अनिल फ्रान्सिस यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. ''आम्ही राबविलेल्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या उपक्रमांना मिळालेली ही मोठी पोचपावती आहे,'' अशी भावना मुख्याध्यापकांनी व्यक्त केली. भविष्यातही शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून दर्जेदार शिक्षणाचे नवे मानदंड प्रस्थापित करण्याचा संकल्प शाळेने व्यक्त केला आहे. शाळेच्या या यशाबद्दल परिसरातील नागरिक आणि पालकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बोरीपार्धीत शेण-सांडपाणी व्यवस्थापनाच्या वादातून पोलीस ठाण्यात तक्रार

### अस्वच्छता आणि बेकायदेशीर वाहतूक कोंडीकडे ग्रामपंचायतीचेही दुर्लक्ष

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** दौंड तालुक्यातील बोरीपार्धी येथे गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या शेण-सांडपाणी व्यवस्थापनाच्या वादाने आता कायदेशीर वळण घेतले आहे. ग्रामपंचायतीने नोटीस बजावूनही वादावर तोडगा न निघाल्याने, या प्रकरणी तक्रारदार सोमनाथ मारुती सोडनवर यांनी प्रवीण सदानंद खरमाळे याच्या विरोधात केडगाव पोलीस चौकीत गुन्हा दाखल केला आहे.

बोरीपार्धी येथील थोरतमळा परिसरात राहणारा प्रवीण खरमाळे याच्याकडील शेण साठवणूक आणि म्हशी धुण्याचे सांडपाणी उघड्यावर सोडले जात असल्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास होत होता. या संदर्भात सोमनाथ सोडनवर यांनी ग्रामपंचायतीकडे तक्रार केली होती. याची दखल घेत, ५ डिसेंबर २०२५ रोजी बोरीपार्धी ग्रामपंचायतीने प्रवीण खरमाळे याला अधिकृत नोटीस बजावली होती. सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करा, अन्यथा महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा ग्रामपंचायतीने दिला होता. ग्रामपंचायतीची नोटीस मिळूनही हा प्रश्न सुटण्याऐवजी खरमाळे याने आपली मुजोरी कायम ठेवली.



२० एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ५:१५ च्या सुमारास प्रवीण खरमाळे याने सोमनाथ सोडनवर यांना गाठून, या विषयावरून त्यांना गंभीर धमकी दिली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकारानंतर सोमनाथ सोडनवर यांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून प्रवीण खरमाळे याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३५२ (गुन्हेगारी धमकी) आणि ३५१(२), ३५१(३) नुसार तक्रार नोंदवण्यात आली आहे. केडगाव पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. खरमाळे याच्या आडमुठे स्वभावाचा फटका यापूर्वीही अनेकांना बसला आहे. घरातील महिलांना पुढे करून नाहक शिवीगाळ करून लोकांना गप्प बसण्यास भाग पाडायचे या त्याच्या दादागिरीमुळे कोणी तक्रार देण्यास पुढे आले नाही. त्यामुळे आता केडगाव पोलीस या प्रकरणावर काय कारवाई करतात की त्याला असाच मोकळा सोडून देतात ते पहावे लागेल.

## पावसाळ्यातील संभाव्य नैसर्गिक आपत्ती हाताळण्यासाठी नियंत्रण व नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवू शकणाऱ्या परिस्थितीत नागरिकांना तात्काळ मदत मिळण्यासाठी तसेच अशी परिस्थिती हाताळण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उप आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून तर अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद मिळावा, यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.

पावसामुळे शहरात गंभीर पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे रक्षण करणे आणि नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचविणे आवश्यक आहे. यासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उपआयुक्त या पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून व अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नोडल अधिकाऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई यासारख्या कामकाजाची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा. तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील पूरनियंत्रण आराखड्यानुसार आपत्ती व्यवस्थापन, स्थापत्य, पाणीपुरवठा, आरोग्य, अग्निशमन, वैद्यकीय व विद्युत विभागाशी समन्वय साधून पूरनियंत्रण व आपत्कालीन सेवा सुरळीतपणे पार पाडाव्यात, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## 'सीएमए' विद्यार्थी व सदस्यांसाठी स्वतंत्र 'हेल्पडेस्क'ची सुविधा

### सीएमए टीसीए श्रीनिवासा प्रसाद यांची माहिती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** ''कॉस्ट अँड मॅनेजमेंट (सीएमए) क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी असून, विद्यार्थ्यांचा या अभ्यासक्रमाकडे कल वाढला आहे. दिवसेंदिवस सीएमए करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या व सदस्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी संस्थेच्या वतीने स्वतंत्र हेल्पडेस्कची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याबरोबरच प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता व सुलभता आणली जात आहे,'' अशी माहिती दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे (आयसीएमएआय) राष्ट्रीय अध्यक्ष सीएमए टीसीए श्रीनिवासा प्रसाद यांनी केले.

सीएमए व्यवसायाच्या सक्षमीकरणासाठी संस्थेचे नेतृत्व आणि सदस्य यांच्यातील सातत्यपूर्ण संवाद, ज्ञानविनिमय आणि कौशल्यवृद्धी महत्त्वाची ठरते, असेही त्यांनी नमूद केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएमएआय) पुणे चॅप्टरच्या वतीने केंद्रीय व विभागीय समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या सत्कार व संवाद सोहळ्यात श्रीनिवासा प्रसाद बोलत होते.




कर्वेनगर येथील सीएमए भवनात झालेल्या कार्यक्रमावेळी 'आयसीएमएआय'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष सीएमए नीरज जोशी, केंद्रीय समिती सदस्य सीएमए नवनीत जैन, सीएमए आशिष थत्ते, पश्चिम विभागीय समितीचे सचिव सीएमए चैतन्य मोहरीर, उपाध्यक्ष सीएमए नॅन्टी शाह, पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली, उपाध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, सचिव सीएमए हिमांशू दवे, खजिनदार सीएमए तनुजा मंत्रवादी, 'आयसीएमएआय'चे माजी अध्यक्ष सीएमए डॉ. धनंजय जोशी, पुणे चॅप्टरचे सल्लागार सीएमए डॉ. संजय भार्गवे यांच्यासह सीएमए सदस्य उपस्थित होते.

## चिखली येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून पाहणी; प्रक्रिया केलेले पाणी प्रभावी पुनर्वापरावर भर...

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी चिंचवडचे वाढते शहरीकरण आणि भविष्यातील सांडपाणी व्यवस्थापनाची गरज ओळखून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी चिखली येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला (डढ्झ) भेट देऊन तेथील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. चिखली परिसरातील सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी प्रशासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

या दौऱ्यादरम्यान सभापती अभिषेक बारणे यांनी प्रकल्पाच्या संपूर्ण कार्यप्रणालीची सविस्तर माहिती घेतली. सांडपाण्याचे शुद्धीकरण कोणत्या स्तरावर केले जाते आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा प्रभावी पुनर्वापर कसा करता येईल, यावर त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. शहरातील जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध तांत्रिक उपाययोजनांचा आढावा घेताना त्यांनी व्यवस्थापकांना सूचनाही केल्या.




हार्दिक अभिष्टचिंतन
सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, युवा नेते
मा.श्री.विवेकभैय्या बिपिन दादा कोल्हे
यांना वाढदिवासाच्या हार्दिक शुभेच्छा...



श्री भाऊसाहेब जेजुरकर
अध्यक्ष श्री सावता महाराज ट्रस्ट
संचालक पुणतांबा सोसायटी नंबर दोन
ता.राहता, जि.अहिल्यानगर



हार्दिक अभिष्टचिंतन
सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, युवा नेते



मा.श्री.विवेकभैय्या बिपिन दादा कोल्हे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...
व भावी कार्यास खूप खूप शुभकामना
शुभेच्छुक





श्री. सुधाकर नारायणराव जाधव पा.- चेअरमन
श्री. अशोक दत्तात्रय धनवटे पा.- व्हा. चेअरमन
भाग्यश्री विजय धनवटे - मुख्य सचिव
पुणतांबा नंबर - २ वि.का. सहकारी सोसा. पुणतांबा
सन्माननीय सर्व संचालक मंडळ व कर्मचारी रुंद

## संक्षीप्त वृत्त

### नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांचा शहर सहकारी बँकेत सत्कार




■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' श्री जालिंदर बोरुडे योंना कोल्हापूर येथील सत्यशोधक प्रागतीक निर्मिती विचार मंचच्या वतीने महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कार तसेच बौध्द संस्कार संघाच्या वतीने समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शहर सहकारी बँकेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लेंखडे यांच्या हस्ते जालिंदर बोरुडे यांचा सत्कार करण्यात आला. आले. उद्योजक वैभव बोरुडे, मखरे, विवेक गायकवाड, आनंद मोकाटे आदी मान्यवर उपस्थित होते.

### आरती बोडखे हिचे चित्रकला स्पर्धेत यश




■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** लेट श्री एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत असलेली आरती गणेश बोडखे हिने गुरुवर्य बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था अंतर्गत होणाऱ्या महिला दिनानिमित्त चित्रकला स्पर्धेत भाग घेतला होता. या परीक्षेचा नुकताच निकाल लागला. त्या परीक्षेमध्ये आरतीला विशेष प्राविण्य ट्रॉफी व सन्मानपत्रक मिळाले असून तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. भाऊसाहेब टेमक व ॲड. सुरेखा टेमक, शाळेच्या प्राचार्या भारती कुदळे सुपरवायझर महेश शिंदे, राजेंद्र गुजर व सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले.

### पार्वताबाई लोखंडे यांचे निधन



■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** श्रीरामपूर तलुक्यातील टाकळीभान येथील पार्वताबाई भागवत लोखंडे (वय ८५ वर्ष ) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पक्षात दोन मुले, पाच मुली, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार दिलीप लोखंडे, पी. आय. राजेंद्र लोखंडे यांच्या त्या मातोश्री होत.

### आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रशिक्षण केंद्रास भेट; जनगणना मोहिमेला वेग



■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या जनगणना प्रशिक्षण मोहिमेअंतर्गत आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज ड क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक २६ मधील कै. मारुती गेनू कस्पटे प्राथमिक शाळा येथे आयोजित प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन प्रशिक्षण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार तसेच चार्ज अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे उपस्थित होते.

आयुक्तांनी प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची माहिती जाणून घेतली. प्रशिक्षणाची गुणवत्ता, कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

प्रशिक्षणादरम्यान कर्मचाऱ्यांना जनगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, घरगुती सर्वेक्षणाची पद्धत, अचूक माहिती संकलन तसेच नागरिकांशी प्रभावी संवाद याबाबत मार्गदर्शन केले जात असल्याचे त्यांनी पाहिले. तसेच डिजिटल साधनांचा वापर, ॲप-आधारित डेटा एन्ट्री आणि माहिती पडताळणी प्रक्रियेवर दिला जाणारा भर त्यांनी विशेषत्वाने नोंदवला.

संवाद साधताना आयुक्तांनी जनगणना प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सर्व महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जनगणना स्वयं-नोंदणी करण्याचे आवाहन केले.

या प्रशिक्षणामुळे प्रगणक व पर्यवेक्षक अधिक सक्षम होत असून आगामी जनगणना प्रक्रियेसाठी ते आत्मविश्वासाने सज्ज होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले. महापालिकेच्या या उपक्रमामुळे शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेली अचूक लोकसंख्यात्मक माहिती संकलित होण्यास मोठी मदत होणार आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडणार असून त्यासाठी तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. अ, ब, क, ड, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आजपासून प्रशिक्षणास सुरुवात झाली असून इ आणि फ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उद्यापासून प्रशिक्षण सुरू होणार आहे.

# अहिल्यानगरात 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे जंगी स्वागत; जलसंवर्धनाचा संदेश देत उत्साहात आगमन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** 'गोदा ते नर्मदा – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६' चे आज सायंकाळी ६ वाजता अहिल्यानगर शहरात उत्साहात आगमन झाले. शहरात ठिकठिकाणी नागरिकांनी जलयात्रेचे जंगी स्वागत करत जलसंवर्धनाच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अहिल्यानगर शहरात 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी भाजप महायुतीचे सर्व नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आल्यानंतर माळीवाडा मार्गे पायी चालत जलयात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याकडे पुढे सरकली. विशाल गणपती येथे डॉ.सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पारंपरिक कलशासह आरती करण्यात आली.



यावेळी वारकरी संप्रदायातील भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला, तर महिलांनी फुगडी खेळत पारंपरिक उत्सवाचे रंगतदार दर्शन घडवले.

दरम्यान, या जलयात्रेचा भव्य शुभारंभ श्री क्षेत्र चौंडी, अहिल्यानगर येथे पार पडला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तसेच विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत या ऐतिहासिक उपक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळ व समाधीस्थळाला भेट देऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ सुजय विखे पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकातून जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन पाणी व्यवस्थापनाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच, महायुती सरकारच्या माध्यमातून पुढील तीन वर्षांत अहिल्यानगर जिल्ह्यातील एकही जलसंपदा प्रकल्प प्रलंबित राहणार नाही, असा ठाम निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## नगर तालुक्यात महिला मोटार वाहन निरीक्षकास धमकी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत जामखेड रस्त्यावर कर्तव्य बजावत असलेल्या महिला मोटार वाहन निरीक्षकाचे शासकीय वाहन अडवून त्यांना शिवीगाळ व धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याबद्दल चारजणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक आयेशा हुसेन (वय ३६, रा. गुलमोहर रोड सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्या वायु वेग पथक क्रमांक २ वर कार्यरत असताना २४ एप्रिल रोजी दुपारी ही घटना घडली. त्यांनी ओव्हरलोड असलेल्या एका सहा टायर ट्रकवर कायदेशीर दंडात्मक कारवाई करून तो ताब्यात घेतला होता.

सदर वाहन शासकीय कार्यालयात जमा करण्यासाठी घेऊन जात असताना संशयित आरोपी संतोष भास्मा (रा. पिंपळा, ता. आष्टी जि. बीड), अजिनाथ बेरड (रा. निंबोळी ता. नगर), धोंडीराम तुळशीराम निक्रड (रा. मांडले, ता. नगर) आणि जगताप (पूर्ण नाव पत्ता माहिती नाही) यांनी त्यांच्या पांढर्या रंगाच्या क्रेटा कारने हुसेन यांचे वाहन अडवले. संशयित आरोपींनी हुसेन यांच्या ताब्यातील जप्त केलेले वाहन पळवून नेले आणि त्यांना तू नोकरी कशी करते ते बघतो अशी धमकी देऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली.

महिला अधिकार्याच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भवार या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## उन्हाळ्याच्या झळांत वन्यजीवांना दिलासा; प्रभाकरम फाउंडेशनचा पुढाकार



■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** उन्हाळ्याच्या तीव्र झळा वाढत असताना जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रभाकरम फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत चास येथील वनविभागाच्या पाणवठ्यामध्ये पाणी सोडण्याचा उपक्रम राबविला. दरवर्षीप्रमाणे यंदाही फाउंडेशनकडून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात आला.

फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी संबंधित पाणवठ्याची पाहणी करून टँकरच्या माध्यमातून पाणी सोडले. यामुळे बिबटे, हरिण, ससा, कोल्हा, माकड तसेच विविध पक्ष्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाण्याअभावी वन्यप्राण्यांना मानवी वसाहतीकडे वळण्याची वेळ येऊ नये आणि त्यांचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित राहावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर, उपाध्यक्ष अभिषेक थोरात, सौरभ गावखरे आदी उपस्थित होते.

## अज्ञात वाहनामुळे भीषण अपघात; पती ठार, पत्नी गंभीर श्रीगोंदा–काष्टी मार्गावर अपघातांचे सत्र सुरूच

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा–काष्टी मार्गावर अज्ञात वाहनाने अचानक आडवे वळण घेतल्याने दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात हरिश्चंद्र एकनाथराव पवार (वय ४८, रा. करंजकल्ला, ता. कळम, जि. धाराशिव) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली आहे. ही घटना शनिवार दि २५ रोजी सकाळी सुमारे साडे अकराच्या सुमारास हॉटेल अनन्या परिसरात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, पवार हे आपल्या पत्नीसह दुचाकीवरून रांजणगाव गणपती येथील कंपनीत कामावर जात होते. त्यांची दुचाकी हॉटेल अनन्या जवळ पोहोचताच एका अज्ञात वाहनाने अचानक आडवे वळण घेतले. त्यामुळे समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीशी त्यांच्या दुचाकीची जोरदार धडक झाली. या अपघातात पवार दाम्पत्य गंभीर जखमी झाले, तर समोरच्या दुचाकीवर ट्रिपल सीट असलेले तीन तरुण किरकोळ जखमी झाले. हे तरुण श्रीगोंदा परिसरातील असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातानंतर हॉटेल अनन्याचे मालक महेश शेंडगे, त्यांच्या सहकाऱ्यांसह स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली आणि त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोहेकॉ. आप्पा तरटे यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला.

पवार यांच्यावर श्रीगोंद्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नीवर सध्या उपचार सुरू आहेत.त्याबेशुध अवस्थेत असलेल्या ची माहिती समजते पोलिसांनी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला असून अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात वाहनाचा शोध सुरू आहे. दरम्यान, काष्टी –श्रीगोंदा–जामखेड राष्ट्रीय महामार्गावर वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांकडून चिंता व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## सन फार्मा विद्यालयात आरएसपी विद्यार्थ्यांना अग्निशमनाचे प्रशिक्षण



■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक सुरक्षा आणि नागरी संरक्षण या विषयांतर्गत नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आर.एस.पी. (राष्ट्र विद्यार्थी पोलिस) विद्यार्थ्यांसाठी विशेष अग्निशमन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आग विझविण्याचे प्रत्यक्ष धडे देत आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढते तापमान आणि बदलते वातावरण यामुळे विविध प्रकारच्या आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सध्या ३८ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचणाऱ्या तापमानामुळे इलेक्ट्रिक वाहनांना आग लागणे, माळरान व डोंगर पेट घेणे, घरगुती विजेच्या शॉर्टसर्किटमुळे किंवा गॅस गळतीमुळे लागणाऱ्या आगी अशा घटना वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आग लागल्यास योग्य उपाययोजना करून ती कशी नियंत्रणात आणावी याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.

## अहमदनगर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांवर हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील अहमदनगर कॉलेज परिसरात किरकोळ कारणावरून विद्यार्थ्यांमध्ये वाद होऊन मारहाणीची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी सार्थक हनुमंत जाधव (वय १९, रा. जामखेड, सध्या सारसनगर, कानडेमळा, अहिल्यानगर) हा अहमदनगर कॉलेजमध्ये शिक्षण घेत असून २५ एप्रिल २०२६ रोजी इंग्रजीचा पेपर देण्यासाठी कॉलेजमध्ये गेला होता. दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास तो व त्याचे मित्र कॅन्टीनमधून बाहेर पडून लेडीज हॉस्टेल परिसरात आले असता आरोपी किरण खेडकर याने त्याच्या मित्राला धक्का दिला. त्यानंतर मुख्य इमारतीजवळ आरोपींनी त्यांना गाठले. आरोपी आदित्य भिंगारदिवे, किरण खेडकर, सॅम पाटोळे व साहिल खोटे यांनी तुम्ही आमच्याकडे रागाने का पाहता असा जाब विचारत शिवीगाळ केली. यावरून वाद वाढताच आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच कंबरेचा पट्टा व लाकडी फळीने मारहाण करून सार्थक जाधव यास जखमी केले. यावेळी साहिल खोटे याने दगड फेकून त्याच्या मित्रालाही दुखापत केली.

## निरंकारी मिशनच्या वतीने आयोजित शिबिरात १७५ जणांनी केले रक्तदान

### करुणा, प्रेम आणि सह-अस्तित्वाचा प्रेरणादायी उत्सव – मानव एकता दिवस



संत निरंकारी मिशन च्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने बाबा गुरबचन सिंहजी यांचा 46वा स्मृतीदिन"मानव एकता दिवस"म्हणून साजरा केला. त्यानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात 175जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले, यात महिलांची संख्या ही लक्षणिय होती. (छाया :किशोर खुबचंदानी, नगर )

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** हृदयात करुणा, प्रेम आणि एकात्मतेची दिव्य जाणीव जागृत झाली की, मनुष्य आपल्या संकुचित स्वार्थांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण सृष्टीच्या कल्याणाचे प्रभावी माध्यम बनतो. परोपकार, करुणा आणि परमार्थ या उदात्त मूल्यांनी अधोरेखित झालेला हा दिवस उच्च मानवी मूल्यांची जाणीव अधोरेखित करणारा ठरला; 'मानवाने मानवावर प्रेम करावे, एकमेकांचे आधार बनावे' हा संदेश शब्दांच्या पलीकडे जाऊन जनमानसात ठळकपणे रुजला.

'मानव एकता दिवस' २४ एप्रिल रोजी युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंहजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिताजी यांच्या सान्निध्यात, दिल्लीतील ग्राउंड क्र. ८ येथे अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. याचबरोबर देशभरातील हजारो सत्संग केंद्रांवरही हा दिवस श्रद्धा व समर्पणभावाने यशस्वीरीत्या पार पडला. हे केवळ एक आयोजन नव्हते, तर प्रेम, सद्भावना आणि निष्काम सेवेचे प्रभावी प्रतिबिंब म्हणून ते सर्वत्र उमटले.

संत निरंकारी मंडळाचे सचिव आ.श्री जोगिंदर सुखीजा यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज देशभरातील सुमारे २००हून अधिक ठिकाणी रक्तदान शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या माध्यमातून जवळपास ४०,००० युनिट रक्त संकलित करण्यात आले, जे निष्काम सेवा, परोपकार आणि मानवतेप्रती असलेल्या समर्पणाची प्रभावी अभिव्यक्ती ठरले.

युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंह जी यांच्या स्मृतीत साजरा होणारा हा दिवस वर्षभर चालणाऱ्या सेवा उपक्रमांचा प्रारंभबिंदू आहे. याअंतर्गत देशभरात रक्तदान शिबिरांच्या शृंखलेद्वारे सुमारे ७०५ ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित केली जाणार असून, करुणा आणि एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प यामागे आहे

विशेष म्हणजे, रक्तदानाची ही पावन परंपरा मागील चार दशकांपासून अखंडपणे सुरू आहे. आतापर्यंत ९,१७४ रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे १५,००,२३० युनिट रक्त संकलित करण्यात आले असून, मानवसेवेप्रती निरंकारी मिशनची अटळ बांधिलकी यामुळे अधोरेखित होते.

मानव एकता दिवसानिमित्त ब्रांच अहिल्यानगर येथे आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाट्न डॉ. प्रफुल्ल चौधरी व डॉ. कैलास झालानी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले, यावेळी झोनल इन्चार्ज हरीश खुबचंदानी, आनंद कृष्णानी, विठ्ठल खाडे तसेच अनेक मान्यवर व सेवादल सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते, शिबिरात जिल्हा रुग्णालय रक्तपेढी तील अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आवश्यक आरोग्य तपासणी करून सुरक्षित, सुव्यवस्थित आणि प्रभावी पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पूर्ण केली. या उपक्रमातून १७५ इतक्या रक्तयुनिटचे संकलन करण्यात आले,रक्तदान करणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या ही लक्षणीय होती तसेच अनेक जणांनी पहिल्यांदाच रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपत मानवसेवेचे कर्तव्य पार पाडले.संपूर्ण आयोजनात स्वच्छता, सतर्कता आणि सेवाभाव यांना विशेष प्राधान्य देण्यात आले.

# देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा, वादळे येतील, पूर महापुरात सर्व वाहून जाईल मात्र अस्तित्व वाहू देऊ नका

## देवगड येथील गंगापूजन व किर्तन सोहळयात राष्ट्रसंत गुरूवर्य श्री भास्करगिरी बाबांचे आवाहन


■ जनप्रवास प्रतिनिधी

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील गुरूदेव दत्त पीठ असलेल्या श्री क्षेत्र देवगड येथे राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांच्या मातोश्री गुरूमाता श्रीमती सरूआई पाटील यांच्या चौदाव्या निमित्ताने आयोजित गंगापूजन व किर्तन सोहळयाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा,वादळे येतील,पूर महापुरात सर्व वाहून जाईल मात्र अस्तित्व वाहू देऊ नका असे आवाहन यावेळी झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी राष्ट्र संत गुरूवर्य श्री भास्करगिरी बाबांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या चौदाव्या विधीच्या निमित्ताने कलशात आणण्यात आलेल्या देशभरातील अनेक गंगाजलाचे पूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा,त्यांचे बंधू मधुकरबाबा पेसोडे पाटील,भगिनी कमलबाई रायपुरे व पेसोडे पाटील परिवारातील सदस्यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी झालेल्या उदक शांती व गंगापूजन कार्यक्रमाचे पौरोहित्य भेंडे येथील वेदशास्त्रसंपन्न गणेशदेवा कुलकर्णी,शरदगुरू काटकर,हेमंत देवा कुलकर्णी यांच्यासह ब्रम्हवृंद मंडळींनी केले.यावेळी येथील ज्ञानसागर किर्तन मंडपामध्ये हजारो भाविकांच्या उपस्थितीत गिरी आश्रमाचे महंत श्री कैलासगिरीजी महाराज यांचे आईवडील यांचा महिमा सांगणारे किर्तन झाले.

यावेळी झालेल्या किर्तन सोहळयात गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी आपले





विचार व्यक्त केले ते म्हणाले की राष्ट्राची असलेली संस्कृती व प्रेम जतन करून

आपापले काम करत राहण्याचा प्रयत्न झाला पाहिजे हे करतांना राष्ट्र समोर ठेवा,त्यासाठी निद्रेत व स्वप्नातही जागृत रहाण्याचा प्रयत्न करा,देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा,वादळे येत राहतील,अधूनमधून गारपीट ही होत राहतील,पूर महापूर ही येत राहतील त्यात सर्व वाहून अस्तित्व वाहून जाऊ देऊ नका असे आवाहन त्यांनी केले.

येणाऱ्या वावटळात कचरा उडत राहील त्याला झटकून द्या,कचरा उडवणारा देखील सुखात रहावा अशी प्रार्थना त्यांनी केली,आपल्याला कोनाविरुद्ध दंड थोपटायांचे नाहीतर त्यांचे दंड दाबायचे आहे,कारण दंड थोपटले तर एक दिवस तो फ्रॅक्चर होऊन जाईल असा संदेश देत आईवडीलांच्या सेवेमध्ये अंतर देऊ नका, आईवडीलांसमोर नियम शास्त्रे असेल तर ते बाजूला ठेवा,शेवटच्या श्वासापर्यंत आईवडीलांची सेवा करा असे आवाहन त्यांनी केले.

आपला धर्म व देशातील माणुसकीमुळे भारतातील प्रत्येक पुरुष हा रामाचा अवतार असून आपल्या देशातील महिला ही सीतामाईचा अवतार आहे,रामाने आचार व नियम दिला तर सीता मातेने कर्तृत्व दिले अशी पाश्चात्य लोकांची धारणा आहे हीच धारणा आपल्यात रुजावी व प्रभू रामचंद्रांने निरहेतुकपणे हे कार्य करून घ्यावे अशी प्रार्थना त्यांनी यावेळी बोलतांना केली.यावेळी उपस्थित संत महंत मंडळींचे संतपूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा व देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी बाबांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले वारकरी संप्रदायातील संत महंत, कीर्तनकार,प्रवचनकार,भजनी मंडळाचे सेवेकरी,पंचक्रोशीतील पुरुष,युवक सेवेकरी, महिला भाविक उपस्थित होते. उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून गंगापूजन व किर्तन सोहळयाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आले.

# जिल्हा हिवताप कार्यालय व प्रयत्ना नर्सिंग स्कूल येथे जागतिक हिवताप दिन उत्साहात साजरा

## डास नियंत्रण, स्वच्छता आणि जनसहभागातून हिवतापमुक्त समाजाकडे वाटचाल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस जागतिक हिवताप दिन म्हणून साजरा केला जातो. हिवताप (मलेरिया) हा डासांडरे पसरणारा गंभीर संसर्गजन्य रोग असून त्याच्या प्रतिबंधासाठी जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाचा जागतिक हिवताप दिन विविध जनजागृती उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावर्षी हिवताप दूरीकरणासाठी कटिबद्ध, आता हे शक्य आहे... आता हे केलेच पाहिजे! या घोषवाक्याखाली हिवताप विभाग अहिल्यानगर शहर व अहिल्यानगर महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून शहरातील नागरिकांमध्ये डास नियंत्रण व हिवताप प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, आठवड्यातून एक दिवस 'कोरडा




दिवस' पाळणे, मच्छरदाणीचा वापर करणे तसेच ताप आल्यास त्वरित रक्त तपासणी करून घेणे, असे महत्त्वपूर्ण आवाहन यावेळी करण्यात आले. आज जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. नारायण वायभासे, अहिल्यानगर आरोग्य विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, साथरोग अधिकारी डॉ. सृष्टी बनसोडे, सिव्हिल नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आरती डापसे, प्रयत्ना नर्सिंग स्कूलच्या प्राचार्य श्रीमती दीक्षा घाटविसावे, प्रभारी सहा. जि. हि. अधिकारी गजेंद्र सांगळे, तसेच आरोग्य पर्यवेक्षक विलास लटपटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा हिवताप कार्यालय तसेच प्रयत्ना नर्सिंग स्कूल येथे जागतिक हिवताप दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हिवताप विभागाचे आरोग्य निरीक्षक पुरुषोत्तम आडेप, सिव्हिल नागरी आरोग्य केंद्रातील एलएचव्ही श्रीमती बांगर, आरोग्य सेविका मीना गुंड, सर्व आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका तसेच हिवताप विभागाचे आरोग्य कर्मचारी मनीष ईश्वरे, प्रशांत चव्हाण, अमोल दहातोंडे, विशाल शिंदे आणि दत्ता सातपुते यांनी विशेष प्रयत्न केले.

# जनगणनेतील प्रत्येक टप्पा अचूक आणि सुलभ पद्धतीने पार पाडा : अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जनगणना मोहिमेअंतर्गत प्रशिक्षण प्रक्रियेला गती मिळाली असून अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी आकुर्डी येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात सुरू असलेल्या प्रशिक्षण सत्राला भेट देत मार्गदर्शन केले. त्यांनी प्रशिक्षणाची प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण कार्यपद्धतीचा आढावा घेतला.

या भेटीदरम्यान उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार, सहा.आयुक्त किरणकुमार मोरे, चार्ज अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे आदी उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची सविस्तर माहिती जंगम यांनी घेतली. प्रशिक्षणाची रचना, विषयांची मांडणी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी याबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी प्रशिक्षण अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या. जनगणनेतील प्रत्येक टप्पा अचूक आणि सुलभ पद्धतीने पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना आवश्यक ते कौशल्य देण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः घरगुती सर्वेक्षण, माहिती संकलनातील काटेकोरपणा, नागरिकांशी संवाद कौशल्य आणि डिजिटल साधनांचा वापर या बाबींचे प्रशिक्षण प्रभावीपणे दिले जात असल्याचे त्यांनी पाहिले. ॲप-आधारित डेटा नोंदणी आणि पडताळणी प्रक्रियेमुळे काम अधिक सुलभ आणि पारदर्शक होत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार म्हणाले की, प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक प्रगणक व पर्यवेक्षकाला प्रत्यक्ष कामासाठी सक्षम केले जात आहे. अचूक माहिती संकलन आणि वेळेवर डेटा सादर करणे हीच या प्रक्रियेची खरी किल्ली असून त्यासाठी आम्ही सर्व पातळ्यांवर काटेकोर नियोजन केले आहे.

# मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील घाटाला मिळणार बायपास, 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे १ मेला उद्घाटन

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली मिसिंग लिंकच्या कामाची पाहणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः 'ॲक्सेस कंट्रोल' बनवणाऱ्या महत्त्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत, असे त्यांनी सांगितले. सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (चड्ढ्रउ) हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले. मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील, असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात हलकी वाहने आणि बसांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही. सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा देशातील पहिला ॲक्सेस कंट्रोल मार्ग ठरला होता. या मार्गामुळे आयटी, सेवा क्षेत्र, उद्योग आणि रिअल इस्टेटमध्ये मोठी वाढ झाली. आता मिसिंग लिंक प्रकल्पामुळे या मार्गाची कार्यक्षमता आणखी वाढणार आहे. तसेच



या प्रकल्पामुळे लोहगड, विसापूर किल्ले आणि कार्ला लेणी यांसारख्या पर्यटन स्थळांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळणार असून पर्यटनालाही चालना मिळेल. यासाठीच या प्रकल्पातील बोगद्यांना देखील गडकिल्ले आणि कार्ला लेण्याच्या प्रतीकृतीप्रमाणे सजवण्यात आले असल्याचे शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. कामाचा दर्जा उत्तम ठेवून ही शिल्प खराब होऊ नयेत याची पुरेशी खबरदारी घेण्यात आली असल्याचे यावेळी शिंदे यांनी स्पष्ट केले.

# संत तुकाराम नगर परिसरात नागरिकांमध्ये हिवताप प्रतिबंध व स्वच्छतेबाबत करण्यात आली जनजागृती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** जागतिक हिवताप दिनानिमित्त आज पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) यांच्या वतीने संत तुकाराम नगर तसेच रुग्णालय परिसरात हिवताप (मलेरिया) जनजागृतीसाठी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभात फेरीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये हिवताप प्रतिबंध, नियंत्रण आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

प्रभात फेरीदरम्यान जागतिक आरोग्य संघटनेच्या यावर्षीच्या हिवताप निर्मूलनासाठी कटिबद्ध – आता हे शक्य आहे, आता हे केलेच पाहिजे! या घोषवाक्याचा प्रसार करण्यात आला. तसेच कोरडा दिवस पाळा, हिवताप टाळा, घराभोवती पाणी साठू देऊ नका, मच्छरदाणीचा वापर करा आणि पूर्ण अंग झाकणारे कपडे परिधान करा अशा घोषणा देत प्रतिबंधात्मक उपायांची माहिती नागरिकांना




देण्यात आली. हिवताप हा डासांमुळे होणारा आजार असून योग्य काळजी आणि सातत्यपूर्ण जनजागृतीडरे त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते, असा संदेशही यावेळी देण्यात आला. या प्रभात फेरीचे आयोजन पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय प्रशासन, जनआरोग्य वैद्यकशास्त्र विभागाचे (कम्युनिटी मेडिसिन) प्राध्यापक व कनिष्ठ निवासी डॉक्टर, यशवंतराव चव्हाण स्मृती परिचर्या विज्ञान संस्था महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी तसेच कुटुंब कल्याण विभागातील कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून करण्यात आले. सदर कार्यक्रमास पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे तसेच जनआरोग्य वैद्यकशास्त्र विभागाचे प्राध्यापक तथा विभागप्रमुख डॉ. हर्षल पांडवे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहयोगी प्राध्यापक डॉ. मुकेश बावा, सहाय्यक प्राध्यापक सॅमसन लिओ यू, आरोग्य सहाय्यक माणिक चव्हाण, एमपीडब्ल्यू संतोष काशीद तसेच कनिष्ठ निवासी डॉक्टर उपस्थित होते. यावेळी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत आरोग्याबाबत सतर्क राहण्याचे तसेच हिवतापाची लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले.

# केंद्रीय मंत्री जयंत चौधरी यांच्या हस्ते लिंगभाव समावेशनावरील आशियातील पहिल्या युनेस्को अध्यासनाचे उद्घाटन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी आज आज 'लिंगभाव समावेशन आणि कौशल्य विकास' या विषयावरील युनेस्को अध्यासनाचे उद्घाटन केले. सिम्बॉयसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (एसएसपीयू), पुणे येथे युनेस्कोच्या सहकार्याने आयोजित 'विमेन लीडिंग द फ्युचर ऑफ वर्क' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचा हा एक भाग होता. श्री. चौधरी यांच्या हस्ते या अध्यासनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, नॉर्वेच्या महावाणिज्य दूत मोनिका नागेलगार्ड, एसएसपीयूच्या प्र-कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. केंद्रीय मंत्री श्री चौधरी म्हणाले, भारताच्या विकासाची दिशा केवळ त्याच्या व्याप्तीवरूनच नव्हे, तर आपण आपल्या लोकांना किती समावेशकपणे सक्षम करतो, यावरून निश्चित होईल. ते म्हणाले की, युनेस्को चेअर सारखे उपक्रम हे सुनिश्चित करतात की, सेमीकंडक्टर्स, प्रगत उत्पादन आणि आधुनिक काळातील तंत्रज्ञान यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये महिला आघाडीवर असतील.

# राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा नव्या जल क्रांतीची दिशा : आमदार आशुतोष काळे

■ जनप्रवास वार्ताहर

**कोळपेवाडी :** राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.श्रीम.सुनेत्राताई पवार व उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे महाराष्ट्र राज्याला प्रगतीच्या दिशेन घेवून जात आहेत. संपूर्ण देशात आपले राज्य सर्वच क्षेत्रात प्रगतीच्या बाबतीत अव्वल कसे राहील यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु असून विकसित राज्य करण्यासाठी संपूर्ण राज्य पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे.त्यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेच्या माध्यमातून शाश्वत पाणी व्यवस्थापन संकल्पना अधिक बळकट होवून राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी 'गोदा ते नर्मदा' जल यात्रा नव्या जल क्रांतीची दिशा ठरणार असल्याचा विश्वास आमदार आशुतोष काळे यांनी व्यक्त केला.

जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा अंतर्गत मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधत २५ ते २९ एप्रिल 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर रविवार (२६) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते कोपरगाव मतदार संघातील कुंभारी येथे दक्षिण वाहिनी गोदावरी नदीच्या पाण्याचे विधिवत जल पूजन करून या पाण्याचा जल कुंभ पाटबंधारे विभागाचे उपअभियंता संदिप पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी ह्या देशातील दूरदर्शी व लोकाभिमुख शासक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी गरीब, वंचित, शेतकरी आणि सामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून कारभार केला. घाट धर्मशाळा, तीर्थक्षेत्र विकास, पाणी व्यवस्थापन, लघु सिंचन आणि समाज हिताच्या अनेक प्रभावी कामातून त्यांनी आदर्श सुशासन कसे असावे याचा आदर्श घालून दिला आहे. जनतेला



दुष्काळाच्या झळा जाणवू नये यासाठी लघु कालव्यांचे जाळे उभारणे, पाणी साठवण आणि जलसंवर्धन, शेतीपूरक विकास हे अहिल्यादेवींचे जलसंवर्धनातील कार्य प्रेरणादायी असून ह्या प्रेरणेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे आयोजन संकल्पना अत्यंत चांगली आहे. या 'गोदा ते नर्मदा' जल यात्रेच्या माध्यमातून राज्यातील जलव्यवस्थापन अधिक प्रभावी, लोकाभिमुख व शाश्वत होण्यास मदत होवून जलसंवर्धनाचा संदेश प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात झालेली जलसंधारणची कामे त्या सोबतीला 'गोदा ते नर्मदा' जल यात्रेमुळे महाराष्ट्र राज्य नक्कीच दुष्काळ मुक्तीवर मात करील व राज्यातील शेतकरी, जनता सुखी होईल असा आशावाद आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी व्यक्त केला. व 'गोदा ते नर्मदा' जल यात्रा हा विशेष राज्यव्यापी उपक्रम हाती घेतल्याबद्दल महायुती शासन व राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्णजी विखे पाटील यांचे आभार मानले.

यावेळी प.पू.राघवेश्वरनंदगिरीजी महाराज, गोदावरी पाटबंधारे कोपरगाव उपविभागाचे उपअभियंता संदिप पाटील, स्व. नामदेवरावजी परजणे गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, संभाजीराव काळे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सूर्यभान कोळपे, प्रशांत घुले, विष्णु शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास केकाण, जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे संचालक नानासाहेब चौधरी, माजी उपसभापती वाल्मिकराव कोळपे, डॉ. आय. के.सय्यद, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नात्याच्या प्रवासातील धोकादायक वळणे



आपल्या दैनंदिन कामात एवढे व्यग्र असतो की, आपल्या भोवताली होत असलेल्या बदलांकडे लक्ष देऊ शकत नाही. यामुळे नाती कडवट होऊन संपण्याकडे वळतात. त्यापूर्वी आपल्याला काही संकेतही मिळतात; पण आपल्या निष्काळजी व बेपर्वा वृत्तीमुळे आपण तिकडे पाहत नाही. विशेषत: पती-पत्नीतील नाते अत्यंत नाजूक असते व ते जपण्यासाठी हे संकेत समजून घ्यायला हवेत.

**जोडीदाराची वृत्ती –** अचानक काही होत नसते. गोष्टी हळूहळू बदलतात. जोडीदाराचे शारीरिक संकेत समजण्याचा प्रयत्न करा. त्यात पूर्वीपेक्षा वेगळे काही जाणवते का ? आता तो पूर्वीसारखा आपल्याकडे लक्ष देत नाही का ? आपल्यासोबत बोलत नाही का ? जवळ आल्यानंतर असहज होतो का ? मुलांव्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयावर बोलत नाही का ? असे काही असेल तर परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वीच सावरायला हवी.

**प्रेम हरवणे –** पती-पत्नीतील प्रेमाची, आपुलकीची भावना कमी होणे हेही नात्यात दुरावा निर्माण झाल्याचे लक्षण आहे. जर पूर्वीचा प्रेमाचा उबदारपणा आता शोधूनही सापडत नसेल, तर तो धोक्याचा इशारा समजा.

**वागण्यातील बदल –** आपल्या विनोदावर तो हसणे सोडाच साधे स्मितही करण्याचे कष्टही घेत नाही. आपल्या बोलण्याकडे त्याचे लक्षच नसते, तो विनाकारण पटकन रागावत वा वैतागत असेल, तर ती धोक्याची घंटा समजा.

**आपली साथ नकोशी वाटणे –** जर तो आपल्यासोबत एकांतवासात काही क्षणही घालवू इच्छित नसेल, तर दुरावा वाढत आहे से समजा. त्याचे उपेक्षित वागणे इतरांनाही ापल्या संबंधात तणाव असल्याचे दर्शवित असेल, तर ती अत्यंत कठीण परिस्थिती असते.

**व्यक्तिमत्त्वात बदल –** तो दिवसेंदिवस बदलत चालला ाहे असे वाटत असेल. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाच्या पूर्वीपेक्षा दक्ष राहात असेल रोज नवनवीन फॅशनेबल पोशाख करीत असेल, तर त्याच्या या अचानक बदलातून समजा की, त्याच्या जीवनात काही नवे रोमांचक होत आहे. कदाचित आपली जागा इतर कोणीतरी घेत आहे.

**संपर्क साधणे कठीण –** आपण कितीवेळा त्याला कॉल केला तो कितीवेळा आपल्याशी बोलला हे पाहिलंत का ! 'पुन्हा फोन करतो' असे म्हणून फोन डिस्कनेक्ट करून दिवसभर वाटच पाहावी लागली का ? वेळ नाही म्हणून त्याने किती प्रसंग टाळले. तो खरोखरच कामात असतो की, जाणूनबुजून सबबी सांगतो हे त्याला विचारा. त्याच्यात जाणवणाऱ्या या बदलांची जाणीव त्याला करून देऊन आपल्याला याचे उत्तर हवे असे सांगा ही लक्षणे दिसताच सावध व्हा. अन्यथा सच का सामना करण्यास तयार राहा.

# कमी वेळ झोपल्याने आयुष्य कमी होते



एका रात्रीत कमीत-कमी आठ तास झोप घेतली पाहिजे, असा सल्ला घराघरातील आजी-आजोबा देत असतात. दुसरीकडे सहा तास झोप पुरेशी, असा निष्कर्ष आधुनिक वैद्यकशास्त्र काढते. येथील बोस्टनमधील वुमन्स हॉस्पिटलच्या शास्त्रज्ञांनी मात्र या दोन्ही निकषांना डावलणारा वेगळाच निष्कर्ष काढला आहे. या नव्या संशोधानानुसार एका रात्रीत सात तासांपेक्षा जास्त वेळ झोपल्याने जिवाला धोका निर्माण होऊ शकतो.

१९८२ ते १९८८ या कालावधीत तीस वर्षे वय असलेल्या लक्षावधी अमेरिकन नागरिकांचा वैद्यकीय अहवाल पाहून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या कालावधीत सात तासांपेक्षा जास्त झोप घेणाऱ्या नागरिकांच्या जिवाला असलेला धोका वाढला होता. सात तास झोप घेणाऱ्यांपेक्षा आठ तास झोप घेणाऱ्यांच्या जिवाला असलेल्या धोक्यात १२ टक्क्यांनी वाढ झाली होती, असे या शास्त्रज्ञांना आढळून आले. अमेरिकेतील आधुनिक शास्त्रज्ञांनी एका रात्रीत सात तास झोप आवश्यक मानली असून, त्यापेक्षा कमी वेळ झोपल्याने आयुष्य कमी होते, तर जास्त वेळ झोपल्याने जिवाला धोका निर्माण होतो,

या मुद्यावर बहुतेक शास्त्रज्ञांचे एकमत आहे. आठ तासापेक्षा जास्त झोपणे हे आजारीपणाचेही लक्षण असू शकते. त्यामुळेही आयुष्य घटते, असे या शास्त्रज्ञांनी म्हटले आहे. सध्याच्या धकाधकीच्या व तीव्र स्पर्धेच्या काळात मानसिक तणाव पराकोटीला पोहोचला आहे. त्याचा निचरा व्हायचा असेल तर पुरेशी म्हणजे रात्रीत सात तास झोप कटाक्षाने घेतलीच पाहिजे, असा सल्ला या शास्त्रज्ञांनी तरुण पिढीला दिला आहे.

■■■

# निरंकुश इच्छाच मनुष्याला त्रासदायक



आपण स्वतःच स्वतःला इच्छा-आकांक्षांच्या हवाली करणे म्हणजे ब्रेक नसलेल्या गाडीत बसण्यासारखे आहे. कारण, या गाडीला अपघात घडणार हे निश्चित आहे. 'इच्छा जर घोड्यांच्या रूपात असत्या, तर मूर्ख लोक त्यावर नक्कीच स्वार झाले असते,' हे सत्यच आहे. इच्छा थांबता थांबत नाही. त्या आपल्या ताब्यात राहात नाहीत, लगाम तोडून निघून जातात. मग आता तुम्हीच विचार करा की अशा बेलगाम घोड्यावर कोण बसेल ?

अर्थातच, ज्याला आपला घात करून घ्यायचाय तोच ! इच्छांचा जितका भोग घ्याल, तितक्या त्या आणखी वाढतात. तसं पाहिलं तर, मनुष्याच्या निरंकुश इच्छाच त्याला त्रासदायक ठरतात. मनुष्याकडे तर इतक्या इच्छा वसलेल्या आहेत जितके आकाशात तारे वा वाळंवटातील वाळूचे कण ! जे सुख, समाधान आहे ते कशातही नाही. त्याग हाच मनुष्याचा भाग्याचा निर्माता आहे. मनुष्य जोवर हा देह व शरीर धारण करून आहे. तोवर त्याच्यात इच्छा ही टिकून राहणारच; पण, 'योगी' आणि भोगी यांच्या इच्छांमध्ये मात्र दिवस-रात्रीचे अंतर असते.

भोगीच्या इच्छा हजारो असतात आणि तो सतत जड अशा सांसारिक इच्छा पूर्ण करण्यामागे वेड्यासारखा धावत असतो. योगी मात्र, आपल्या जीवनात सदाचाराचे पालन करत आपल्या मनात केवळ आपण दिवसेंदिवस पवित्र कसे बनून एवढी एकच इच्छा बाळगून असतो. अशा व्यक्तीचे कधी कुणाशी भांडण होत नाही ना तो कुणाविषयी ईर्ष्या बाळगत नाही. माझ्याकडून लोकांची जास्तीत जास्त सेवा कशी होईल आणि मी दिव्यत्वास कसा प्राप्त होईन, एवढा एकच सत्‌विचार त्याच्या मनात सुरू असतो.

# आपले घर कसे असावे

तुमचं घर तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा असतो. तुम्ही कोण आणि काय आहात, तुमच्या आवडी-निवडी कशा आहेत याबद्दल सगळं तुमचं घर बोलत असतं, लोकांना सांगत असतं. एखाद्या घरात हॉलमधली सतार किंवा पेटी त्या घराची संगीताची आवड सांगते. कधी संपूर्ण घराला गाड्यांच्या फ्रेमनी सजवलेलं असतं. हे सजवणं घरातल्या व्यक्तीची गाडीबद्दलची किंवा कार रेसिंगबद्दलची आवड सांगते. तुमची आवड घरातून व्यक्त होणं म्हणजेच इंटीरियर डिझायनिंगच्या भाषेत थीम हाऊस विकसित करणं.

थीम हाऊस हा इंटीरियर डिझाइनमधला वेगळाच प्रकार आहे. थोडक्यात सांगायचं, तर व्यावसायिक फिल्म तयार करणं आणि कलात्मक फिल्म तयार करणं असा हा फरक आहे. थीम हाऊस ही कलात्मक फिल्म आहे. त्याची बरोबरी व्यावसायिकतेशी नाही करता येत. आपलं संपूर्ण घर एका संकल्पनेवर तयार करणं यासाठी तुमच्याकडे कलात्मकता असलीच पाहिजे. ती बघण्यासाठीही कलात्मकताच हवी.

आम्ही एकदा माझ्या मित्राच्या घराबद्दल बोलत बसलो होतो. बोलता बोलता काळा रंग अशुभ असतो' यावर बोलणं सुरू झालं. तसा तो म्हणाला, अरे, माझ्या घरासाठी ब्लॅक ॲण्ड व्हाइट' थीम करू या.'' तो शुभ-अशुभ न मानणारा होता.

आम्ही त्या थीमवर विचार सुरू केला. भिंतींना पांढरा किंवा काळा-पांढरा मिळून ग्रे द्यायचा असं ठरवलं. मला काही पांढरे गोटे मिळाले. त्यांचा डिझाइनसाठी उपयोग झाला. फर्निचरचा सनमायका लावताना या थीमनुसार काळ्या-पांढऱ्या रंगाचा वापर केला.

एकदा एक थीम निवडली की त्या दृष्टीनेच



विचारप्रक्रिया सुरू होते. बाजारातल्या थीमसाठी उपयुक्त दिसणाऱ्या वस्तू नजरेत भरतात आणि थीम विकसित होते. खरं तर घरासाठी थीम विकसित करण्याची प्रक्रिया खूपच सहज असते. एकदा मनातली कल्पना विकसित होऊ लागली की काळ्या-पांढऱ्या रंगातही सौंदर्य दिसू लागतं.

त्यांचं म्हणणं होतं, रंगाची थीम निवडताना डोळ्याला शांत वाटतील असेच रंग हवेत. टाइल्सही तशाच हव्यात. आता माझं वय झालं. आता ते सगळीकडे रंग-रंग असं नाही सहन होतं. पण याचा अर्थ घरात उदासीनताही नको.'' मग त्यांच्या घरात पांढऱ्या फरशांची निवड केली आणि एकाच पट्ट्यात रंगीत टाइल्स लावल्या. त्या पांढऱ्या रंगात उठूनही दिसत होत्या आणि त्यांना हवं ते कॉम्बिनेशनही मिळालं होतं.

एकाने घरासाठी वाड्याची थीम निवडली. त्या घराला वाड्याचा लुक येण्यासाठी आम्ही घराच्या बाहेरच्या बाजूस कडाप्पा उलट्या बाजूने लावला. तो ओबडधोबड असल्याने त्याला दगडांचा फील आला. बाहेरच्या बाजूला खुंट्या लावल्या, त्याला कंदील टांगले.

बेसिन म्हणून त्या घरात घंगाळं लावलं आणि नळासाठी आम्हाला गोमुख मिळालं. स्वयंपाकघरात कट्ट्याजवळ चूल केली. वेगळा प्रयोग म्हणजे स्वयंपाकघरात कट्ट्यामागे टाइल्स लावतात त्याऐवजी इथे चोळीचा खण वापरला आहे. त्यावर काच लावून तो पॅक केला आहे. घराच्या फर्निचरसाठीही पैठणी आणि जरीच्या साड्या वापरल्या आहेत. त्या घराच्या डिझाइनसाठी आम्ही सात हजारांची एक पैठणी आणून, कापून त्याचं डिझाइन केलं. शेवटी हौसेला मोल नसतं म्हणतात तसंच. एका घरात मदर ॲण्ड चाइल्ड' अशी थीम केली. त्यासाठी भैरप्पांच्या कादंबरीवर चित्रं असतात तशा थीमवर चित्रं काढून घेतलं. त्या घरात तीन मुली आहेत. आई आणि तीन मुली त्या चित्रातून दिसतात. बदक आणि बदकाचं पिल्लू असा एक छानसा शो-पीस या थीमसाठी उपयुक्त ठरला.

व्यक्ती कोण आहे, तिची आवड काय आहे यावरच थीम अवलंबून राहते. एकदा थीम ठरल्यानंतर त्या गोष्टीत वेगळेपणा आणता येतो. एका ठिकाणी फुलपाखराचं चित्र असेल, कुठे शो-पीस असेल, कुठे फुलपाखरू प्लॅस्टिकमध्ये असेल, अशी त्यामध्ये जागेनुसार विविधता आणता येते. कधी कधी थीम हाऊसमध्ये एकसुरीपणा येईल का, अशी काहीजणांना भीती असते. पण अशी विविधता हा एकसुरीपणा नक्की टाळते. एखादी थीम निवडली की ती जपणंही गरजेचं असतं. ग्रह-ताऱ्यांचं सीलिंग करायचं आणि त्यावर दुसऱ्याच दिवशी कसले तरी मागच्या दिवाळीतले आकाशकंदील लटकवायचे, असंही कधी तरी घडतं.

# करिअर घडविण्यामध्ये व्यक्तिमत्त्वाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते




करिअर घडविण्यामध्ये व्यक्तिमत्त्वाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. सर्वांनाच व्यक्तिमत्त्व हे एकमेकांपेक्षा वेगळं असतं. सर्वांच्याच व्यक्तिमत्त्वात काही गुण, तर काही उणिवा या असतातच. शोधक व्यक्तिमत्त्वाची माणसं विश्लेषणात्मक, बुद्धिमान आणि वैज्ञानिक विचारसरणीची असतात. असे लोक, कोणताही निर्णय घेण्यापूर्वी संबंधित विषयाची सखोल माहिती मिळवतात आणि मग योग्य तो निर्णय घेतात. अशा लोकांनी प्रोफेसर, सॉफ्टवेअर डेव्हलपर, फिजिशियन आदी क्षेत्रांत करिअर घडवणे उपयुक्त ठरेल.

**व्यक्तिमत्त्वानुसार कामाची निवड करावी**

काही लोक सुरूवातीलाच आपल्या आवडीनुसार कामाची निवड करत नाहीत आणि मग मात्र कामाचा कंटाळा करत बसतात. कामाचा तिरस्कार करू लागतात. असे एक-दोन नव्हे, तर लाखो लोक आहेत, ज्यांना आपले करिअर सुरू केल्यानंतर असे वाटू लागले की, त्यांचे व्यक्तिमत्त्व या क्षेत्राशी मिळतेजुळते नाही. ज्याप्रमाणे प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व हे वेगवेगळे असते अगदी त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रातली प्रवृत्तीही वेगवेगळी असते.

**व्यावहारिक प्रवृत्ती**

ज्या व्यक्ती व्यावहारिक असतात आणि ज्यांचे विचार अगदी सरळ असतात त्यांचे सारे लक्ष ध्येयावर केंद्रित झालेले असते. अशाप्रकारचे व्यक्तिमत्त्व असणाऱ्यांसाठी इलेक्ट्रिशियन, ऑर्थोडेंटिस्ट, सर्जिकल टेक्नॉलॉजिस्ट, बायोमेडिकल आणि इंजनिअरिंगसारखी क्षेत्रं उपयुक्त ठरतात.

**कलात्मक प्रवृत्ती**

जे लोक कलात्मक प्रवृत्तीचे असतात ते साधारणपणे सृजनात्मक आणि काल्पनिक विचारांचे असतात. त्यांच्याकरिता लॅण्डस्केप आर्किटेक्ट, ग्राफिक डिझाइन, निर्माता-निर्देशक, इंटीरियर डिझायनर, संपादक आदी करिअर चांगले आहेत.

**सामाजिक प्रवृत्ती**

सामाजिक लोक आपल्या आजूबाजूच्या लोकांमुळे लवकर प्रभावित होतात. सर्वांच्या अडी-अडचणी ते आपल्या स्वत:च्याच मानू लागतात. त्यांच्यात कमालीचे धैर्य आणि लोकांच्या अडचणी सोडविण्याचे कौशल्य असते. अशा व्यक्ती स्कूल सायकोलॉजिस्ट, मिडीयेटर, नर्स, फिजिकल थेरपिस्ट, सोशल वर्कर आदी क्षेत्रात यशस्वी होतात.

**व्यावसायिक प्रवृत्ती**

उद्योजक व्यक्ती उत्साही आणि ऊर्जावान असतात. त्यांच्यात चांगली लीडरशीप क्वालिटी असते. आपल्या मनाशी सहमत होण्यास त्या कुणालाही भाग पाडू शकतात.

एक्झीक्युटिव्ह, फायनॅन्शिअल मॅनेजर, सेल्स रिप्रेझेन्टेटिव्ह, सेल्स मॅनेजर आदी पोस्टरवर काम करून अशा व्यक्ती रोज नवनवीन यश मिळवत असतात.

■■■

# आपले खरे सौंदर्य

एखादी सुंदर मॉडेल वा ॲक्ट्रेसचा चमकदार चेहरा पाहून आपण आपल्या चेहऱ्याची तिच्याशी तुलना करू लागता का? आपण थंडीत आपल्या चेहऱ्याबाबत खूपच त्रासलेल्या असतात का ? असे असेल तर घरीच फेस पॅक तयार करून आपण आपल्या चेहऱ्याचे खरे सौंदर्य उजळू शकता. ते फेसपॅक खालील प्रकारे तयार करा.

0 साखर व लिंबांच्या सालींची पावडर समप्रमाणात घ्या. थोडेसे दूध मिसळून दाट पेस्ट बनवा. ही पेस्ट चेहऱ्यावर लावा. ती पूर्णपणे वाळल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा फेसमास्क आवठड्यातून दोनदा लावू शकता. यामुळे चेहरा मुलायम व चमकदार होईल.

0 मध चमचाभर संत्र्याच्या ज्यूसमध्ये मिसळून चेहऱ्याला लावा व २० मिनिटांनंतर धुवा. हा फेसपॅक थंडीत नष्ट झालेला मऊपणा पुन्हा आणतो. यामध्ये त्वचेचे पुरेसे पोषण करणारे व्हिटॅमिन्स व मिनरल्स असतात. त्वचा ऑयली अशेल तर अर्धा चमचा बदाम तेल मिसळावे.

0 कोबी उकडून घ्यावा व त्यातून पाणी पिळून काढावे व ते थंड करून त्या पाण्याने चेहरा धुवावा. नंतर गाजर किसून चेहऱ्यावर लावावे व १५-२० मिनिटांनंतर धुऊन टाकावे. कोबीतील व्हिटॅमिन्स व मिनरल्स आणि गाजरातील व्हिटॅमिन ए त्वचेसाठी फायदेशीर असतात.

0 तीन चमचे बाजरीच्या पिठात चमचाभर मध व दोन चमचे दही मिसळून चेहऱ्याला लावावे. २०-३० मिनिटांनंतर चेहरा धुऊन टाकावा. ऑयली त्वचेसाठी हा फेसपॅक उपयुक्त असतो.

0 दोन चमचे दह्यात चमचाभर पुदिना वा तुळशीच्या वाळलेल्या पानांची पावडव थोडीशी हळद मिसळून चेहऱ्यावर लावावी व २० मिनिटांनंतर थंड पाण्याने धुवावी. यामुळे मुरमांची समस्या दूर होते.

# असे वागाल तर आनंदाने



आपल्या वाड-वडिलांनी आपल्या कुटुंबासमवेत जीवन जगण्याचा आनंद आयुष्यभर लुटला. आपल्या वाट्याला धकाधकीच्या व्यस्त जीवनशैलीमुळे तसे आयुष्य लाभलेले नाही, पण त्या जीवनातील जे क्षण आपल्या वाट्याला आले आहेत ते तरी वाया दवडू नका. थोडेसे असे वागा आणि आनंदाने जगा...

**जिवंतपणे जगा –**

सततच्या दगदगीने, धावपळीने थकायला होते हे जरी खरे असले तरी त्याचा अर्थ उदास, निराश वा एखाद्या व्यसनात स्वत:ला गुरफटून ठेवावे असा मुळीच नाही. आपल्या बायको, मुलांमध्ये रमा. मुलांना प्रेरणा, प्रोत्साहन द्या. पत्नीला दिलासा देऊन खुलवा व जीवनात जिवंतपणा ठेवा.

**इतरांसाठी जगा –**

बरेचजण आपली सुट्टी स्वच्छंदीपणे फक्त स्वत:साठी वापरतात. अगदी आपल्या नोकरदार पत्नीचा व मुलांचाही विचार करीत नाही. पत्नीच्या डोक्यावर तणावाची व मुलांच्या डोक्यावर परीक्षेची टांगती तलवार सताना आपण बेफिकीरपणे राहणे बरे नव्हे.

**थोडेसे रिलॅक्स व्हा –**

आपल्यावर कामाचा प्रचंड भार आहे आपण त्याखाली दडपलो गेलो आहोत असे वाटतंय का? असे असेल तर आपल्या कामाचे निरीक्षण करा. त्यातील अनावश्यक कामांना फाटा द्या. काम आणि आरामाचा ताळमेळ बसवा. जसे आपण देहभान विसरुन काम करता तसेच कामाचा ताण पूर्णपणे विसरुन आराम करा. त्यामुळे आपले शरीर व मन तरतरीत होऊन दुप्पट वेगाने काम करु शकाल.

**काम उत्तमरित्या करा –**

बरेजण यंत्रवत काम करीत राहतात. त्यात नावीन्य शोधण्याचा ते अधिकाधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्नच करीत नाहीत व त्यामुळे त्याची पदोन्नती होत नाही. काम मन लावून उत्कृष्टपणे केल्यास आपणही उच्चपदी पोहोचू शकाल.

## स्वयंपाक घरातील सल्ला

- ● मिठाच्या पाण्यात अंडी उकडल्यास अंड्याचे टरफल सहजतेने निघते.
- ● भेंडी बनवताना ती चिरल्यानंतर ती चिरल्यानंतर लिंबाच्या पाण्याने धुऊन शिजवल्यास तिचा चिकटपणा दूर होईल आणि भाजीही कुरकुरीत होईल.
- ● जर भाजीत मीठ जास्त असेल तर, भाजीत थोडेसे लोणी, थोडीसे लोणी, थोडीशी साखर, टोमॅटो व लिंबाचा रस मिसळून पुन्हा घालून गरम करावी.
- ● हिंगयुक्त स्वच्छ डब्यात डाळी उन्हात वाळवून भरुन ठेवल्यास वर्षभर सुरक्षित राहतात.
- ● साखरेच्या डब्यावर मेथीची पाने चोसळल्यास साखरेत मुंग्या होत नाहीत.
- ● गव्हात कडुलिंबाची पाने, एरंडेल तेल व सरसूचूर्ण मिसळून ठेवल्यास कित्येक महिने ते खराब होत नाही.
- ● लाकडी वस्तु व्हिनेगर पाण्याने स्वच्छ केल्यास त्यावर चमक येते.

## हातांच्या सौंदर्यासाठी नखे जपा

आपल्या हातांचे सौंदर्य आपल्या नखात दडलेले असते. आपण कितीही सुंदर असाल; पण आपली नखे खराब असतील तर आपले सौंदर्य अपूर्ण राहील. नखांचे सौंदर्य कसे वाढवता येईल हे पाहू या.

नखांच्या विकासासाठी प्रोटीनयुक्त व समतोल आहाराची गरज असते. त्यासाठी आपल्या जेवणात फळे,भाज्या,पनीर,दूध इ. चा समावेश करा.

नखांवर सर्वात जास्त दुष्परिणाम होतो तो साबण व डिटर्जण्टचा. डिटर्जण्ट व साबणातील केमिकल्स नखांची क्षती करतात. यासाठी त्यांचा वापर करताना रबरी ग्लोव्हज अवश्य घालावेत.

चुकीच्या पद्धतीने फायलिंग केल्यानेही नखांच्या कडा कमकुवत होतात. फायलिंग करताना एकाच दिशेने घालावे. धातूची नेलफाईल वापरु नये. नखांसाठी उत्तम प्रतीचे नेलपॉशिल वापरावे.

# कामामध्ये 'टीमवर्क' असणे फायदेशीर

कामातील एकसूत्रीपणा, कामाला पुढे नेण्यास मदत करतो. काम कितीही मोठे, किचकट वा अवघड असो, कामाचे स्वरुप लक्षात घेऊन त्याचे योग्य नियोजन केल्यास तेच काम सोपे बनते व विनासायास पूर्णही होते. याशिवाय कुठलेही काम तडीस नेण्यासाठी सहकाऱ्यांची मदत म्हणजे टीमवर्क असणे महत्वाचे ठरते.

काम कधीही मोठे किंवा छोटे नसते. त्याला मोठे वा छोटे आपणस समजत असतो. काम हे कामच असते. फक्त, ते त्याच्या स्वरुपानुसार पूर्णत्वाला न्यावे लागते. मोठ्या कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कामांचे स्वरुप समजून घेऊन त्याचे योग्य नियोजन करुन, आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने कामाची पूर्तता केली पाहिजे. सहकाऱ्यांना त्यासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याने आपल्या सहकाऱ्यांपैकी जे सिनियर कर्मचारी आहेत त्यांना हाताशी धरुन, ज्युनिअर कर्मचाऱ्यांना कामाची पध्दत समजून देऊन कामातील एकेक घटक, एकेक विभाग त्यांच्याकडून पूर्ण करुन घेतल्यास एखाद्यावरील कामाचा ताण कमी करण्यास मदतच होते. तसे पाहता, ज्युनिअर कर्मचारी काम कशाप्रकाश करायचे आहे समजून घेत नाहीत, तोपर्यंत त्याला काम करतादेखील येत नाही. काम विभागले जाऊन ते कमी वेळात पूर्ण करता येऊ शकते. कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये तसेच मल्टिनॅशनल कंपन्यांत, सर्वसाधारणपणे असेच 'टीमवर्क' चे स्वरुप पहायला मिळते. प्रत्येक कर्मचाऱ्याला, त्यांच्या योग्यतेप्रमाणे काम दिलेले असल्याने, त्या-त्या विभागाला, अशा



कर्मचाऱ्यांकडून योग्य न्याय दिला जातो.

कामामध्ये 'टीमवर्क'च चांगल्या पध्दतीने उपयोगी ठरते. याबाबतीत अनेक उदाहरणेही देता येऊ शकतील. सांघिक कामास यश नेहमीच मिळते. नियोजनबध्द, योजनापूर्वक सांघिक काम उच्चकोटीचे असते आणि अशा तऱ्हेचे कामच योग्य तो परिणाम साध्य करु शकते.

कोणत्याही सांघिक खेळात, योग्य नियोजन व अभ्यास करुन खेळ खेळल्यास हमखास यश संपादन करता येते. कंपनीने शक्य झाल्यास वरिष्ठांमार्फत आपल्या कंपनीच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात. कंपनीच्या सर्व विभागांची एकत्रितपणे बैठक बोलावून, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात व वरिष्ठांमार्फत त्यावर योग्य ते उपाय योजावेत. म्हणजेच, कंपनीने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना आपल्या कंपनीचा एक घटक समजून, त्यांच्या अडीअडचणींचा विचार करुन, त्या लवकरात लवकर सोडविण्याचा प्रयत्न करावा. काम नवीन असल्यास कामात असंख्य अडचणी येतात. त्या निष्णात, अनुभवी कर्मचाऱ्यांची एक टीम बनवून, त्या टीमकडून कामातील अडचणी दूर करुन घ्याव्यात.

वरिष्ठांनी आपल्या कर्मचाऱ्यांतील चांगले गुण हेरुन, त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांची उपयुक्तता सिध्द केल्यास, अशा कर्मचाऱ्यांकडून कंपनीला उपयुक्त योगदान मिळते आणि हीच तर एका चांगल्या वरिष्ठ अधिकाऱ्याने केलेली कमाल असते.

■■■

# दोन तासांपेक्षा जास्त वेळ उभे राहून काम करणे योग्य की अयोग्य? तज्ज्ञांनी सांगितले फायदे-तोटे

कोविड-१९ महामारीच्या काळात अनेक जण घरून काम करत होते. त्यादरम्यान उभं राहून काम करणे ही पद्धत खूप लोकप्रिय झाली. सतत बसण्यामुळे होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांवर 'उभं राहून काम करणे' ही पद्धत काही प्रमाणात नियंत्रण मिळवू शकते असे मानले जाते, त्यामुळे ही पद्धत अनेकदा घरी आणि ऑफिसमध्येही आता वापरली जाऊ लागली आहे. पण नवीन अभ्यास असं सांगतो की, दीर्घकाळ उभे राहिल्याने संपूर्ण आरोग्य सुधारण्यास मदत होत नाही.

सिडनी युनिव्हर्सिटीच्या अलीकडील अभ्यासात असे आढळून आले आहे की, दिवसातून दोन तासांहून अधिक वेळ उभे राहिल्याने 'डीप व्हेन थ्रोम्बोसिस' (DVT) आणि व्हेरिकोज व्हेन्ससारख्या आरोग्य समस्या विकसित होण्याचा धोका वाढू शकतो. तर इंटरनॅशनल जर्नल ऑफ एपिडेमियोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात यूके बायो बँकमधील ८३ हजारांहून अधिक प्रौढांच्या डेटाचे परीक्षण केले गेले. तर यावरून असा निष्कर्ष काढला गेला की, उभे राहण्याने स्ट्रोक, हार्ट फेल यांसारख्या हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोगांचा धोका कमी होत नाही.

तर यासंबंधित अधिक जाणून घेण्यासाठी कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलचे सल्लागार आणि हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर प्रवीण कहाळे यांच्याशी चर्चा केली. त्यांनी सगळ्या गोष्टींवर विचार केला आणि सांगितले की, बसण्यापेक्षा उभं राहून काम करणं चांगलं असलं तरीही त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्यामध्ये लक्षणीय सुधारणा होत नाही. त्यामुळे काम करताना आपल्या हालचाल करणे आवश्यक आहे. कारण उभं राहिल्यामुळे आरोग्यास कोणतेही अतिरिक्त फायदे होत नाही.



डॉक्टर प्रवीण कहाळे यांनी दीर्घकाळ उभे राहण्याचे कोणते आरोग्य धोके आहेत हे स्पष्ट केलं आहे.

**डीप वेन थ्रोम्बोसिस**

रक्ताभिसरण कमी झाल्यामुळे नसांमध्ये, सहसा पायांमध्ये रक्ताच्या गुठळ्या (गाठ) तयार होतात. तेव्हा DVT होतो. दीर्घकाळ उभे राहिल्याने रक्तप्रवाह थांबतो आणि रक्तवाहिन्यांमध्ये रक्ताची गाठ तयार होते.

**व्हेरिकोज व्हेन्स**

व्हेरिकोज व्हेन्स म्हणजे अशुद्ध रक्तवाहिन्या फुगून झालेल्या गाठी. जास्त काळ उभे राहिल्याने पायांच्या नसांवर दबाव वाढतो, ज्यामुळे व्हॉल्व्ह सुजतात आणि खराब होतात. म्हणजे या दरम्यान होतं असं की, रक्त आपल्या हृदयाकडे जाण्याऐवजी शिरांमध्ये जमा होते, मग शिरा फुगतात आणि परिणामी व्हेरिकोज व्हेन्स होऊ शकतो; ज्यामुळे पायावर सूज, वेदना, अल्सरदेखील होऊ शकतो.

**वेनस इन्सफिशियन्सी**

वेनस इन्सफिशियन्सी म्हणजे शिरांच्या कार्यामध्ये समस्या निर्माण होणे. डॉक्टर प्रवीण कहाळे सांगतात की, जास्त वेळ उभे राहिल्यास पायांच्या शिरा पसरतात आणि व्हॉल्व्ह काम करत नाहीत. हे विशेषतः त्यांच्यासाठी आहे, ज्यांना उभं राहून काम करणे आवश्यक आहे. जसे की बस वाहक, कारखान्याचे कामगार. पण, ही समस्या हृदयाच्या समस्यांवर परिणाम करत नसली तरीही यामुळे पायांमध्ये मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणजेच, वेळोवेळी याचा परिणाम पायांच्या आरोग्यावर होतो.

या समस्यांवर उपचार न केल्यास अशुद्ध रक्तवाहिन्या फुगून गाठ होते आणि अधिक गंभीर समस्या उद्भवू शकतात. जसे की, अल्सर. मग या सर्व समस्यांसाठी शस्त्रक्रिया किंवा रेडिओफ्रिक्केंसी उपचारांची आवश्यकता असू शकते. या परिस्थितींचा थेट हृदयविकाराशी संबंध नाही, पण यामुळे पायांमधील रक्ताभिसरण प्रणालीची गुणवत्ता खराब होऊ शकते.

या समस्यांवर वेळीच उपचार केले नाहीत तर व्हेरिकोज वेन्स (varicose veins), वेनस इन्सफिशियन्सी (Venous Insufficiency) आदी गंभीर समस्या जसे की पायांवर अल्सर (ulcers) जो लवकर बरा होत नाही, निर्माण होतात. या समस्यांवर उपचार करण्यासाठी शस्त्रक्रिया किंवा रेडियोफ्रीक्केन्सी उपचार घेणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. या समस्या थेट हृदयाच्या आजारांशी संबंधित नाहीत. पण, पायांच्या रक्ताभिसरण प्रणालीतील दीर्घकालीन नुकसान तुमच्या आयुष्यात मोठा धोका आणू शकते. त्यामुळे वेळेत उपचार घेतल्याने या समस्यांपासून तुम्ही दूर राहू शकता. डॉक्टर प्रवीण कहाळे यांनी सांगितले की, काम करताना काही काळ उभे राहणे फायदेशीर ठरू शकते. पण, दीर्घकाळ उभे राहणे हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी पुरेसे नाही. जर तुम्ही दोन तास बसणे आणि दोन तास उभे राहणे यांची तुलना केली, तर हृदयाच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून फरक कमी आहे. खरे फायदे चालणे, धावणे किंवा जॉगिंग यांसारख्या हालचालीतून मिळतात.

**कामाच्या ठिकाणी हालचाल करा**

केवळ उभं राहून काम करण्याच्या हालचालीवर अवलंबून राहण्याऐवजी, तुमच्या दैनंदिन दिनचर्येत नियमित हालचालींचा समावेश करणे हे शारीरिक, हृदय व रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वाचे आहे. कामाच्या दरम्यान थोडे चालणे, स्ट्रेचिंग किंवा सिट-स्टँड सायकल वापरणे देखील मदत करू शकते. कारण कामादरम्यान हालचाल केली की, रक्ताभिसरण सुधारते आणि मानसिक लक्ष, ऊर्जा वाढवण्यास मदत होते. त्यामुळे जास्त वेळ बसणे किंवा उभे राहणे याचे हानिकारक परिणाम कमी होतात. यामुळे तुम्हाला काम करताना अधिक ताजेतवाने तर लक्ष केंद्रित करण्यासदुद्धा मदत होते.

## बायकोने सकाळी-सकाळी 'ड्रामेबाजी' करणे नवऱ्याला आवडत नाही



घरात सतत 'चिडचिड' करतो तो नवरा आणि 'बडबड' करते ती बायको, ही व्याख्या केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात मान्यता पावली आहे. नवरे मंडळी घरात सतत चिडचिड का करीत असतात. म्हणजे बायकोने केलेल्या कोणत्याही गोष्टी त्यांना आवडत नाहीत, म्हणून त्यांची अशी धुसफूस, आदळआपट, आकांडतांडव, थयथयाट चालू असतो, याची 'टॉप टेन' कारणे समाजशास्त्रज्ञांनी शोधून काढली आहेत. ही कारणे म्हणजे नवऱ्यांना वाटणाऱ्या बायकांच्या चुका आहेत. नवऱ्यांच्या मतांशी आम्ही (म्हणजे समाजशास्त्रज्ञ) सहमत असूच असे नाही, असा खुलासाही या शास्त्रज्ञांनी केला आहे.

नवऱ्याला बायकोच्या कोणत्या गोष्टी, कृती, वक्तव्ये आवडत नाहीत व ज्यांची परिणमती शेवटी नवऱ्यांच्या चिडचिडीत होते, याची शास्त्रज्ञांनी दिलेली ही 'टॉप टेन' कारणे..

१. बायकोने सकाळी-सकाळी 'ड्रामेबाजी' करणे नवऱ्याला आवडत नाही. ड्रामेबाजी म्हणजे मुख्य विषयाला थेट हात न घालता नको तितके नाट्यमय होऊन आडमार्गाने विषय पेश करतो. ही ड्रामेबाजी पाहण्याइतका वेळ आपल्याकडे नसतो, असे नवरे मंडळींचे म्हणणे आहे.

२. बायकोने दुसऱ्या एखाद्या महिलेची निंदा-नालस्ती करीत तिच्या तुलनेने स्वत:ला श्रेष्ठ ठरवावे, हे नवऱ्याला आवडत नाही. हे फारच राजकारण्यांच्या पातळीचे राजकारण होतेय, असा नवरेपक्षाचा आरोप आहे.

३. बायकांचा इतरांची 'ईर्ष्या' करण्याचा स्वभाव नवऱ्यांना आवडत नाही, अशा स्वभावामुळे घराचे लक्ष घराबाहेर केंद्रीत होते, असे नवरेमंडळींना वाटते.

४. नवऱ्यांमधील पुरुषाला बायकोचा संशयी स्वभाव आवडत नाही. म्हणजे बायकोने अगदी गुप्तहेराप्रमाणे आपल्या सर्व कृत्यांवर बारीक नजर ठेवावी, हे त्याला सहन होत नाही.

५. बायकोने एकच गोष्ट विविधप्रकारे व विविध कारणांनी वारंवार सांगणे नवऱ्याला आवडत नाही.

६. जरा कुठे हनुवटीला हात लावून बसले की, 'काय विचार चाललाय?' असे बायकोने विचारणे बऱ्याच नवऱ्यांना आवडत नाही. विचार करण्याशिवाय बिनविचारी असताना चुकूनही हनुवटीला हात लावूच नये काय, असा खडा सवाल नवरेपार्टीने केला आहे. येथे 'बिनविचारी' म्हणजे प्रापंचिक दृष्टीने बिनविचारी. तशी प्रत्यक्षात बिनविचारी अवस्था शक्य नसते.

७. ऑफिसमधून घरी आल्यानंतरचा आपला प्रत्येक क्षण बायकोने स्वत:च्या मालकीचा मानू नये, नवरेमंडळींना वाटते व हा ताण असह्य झाल्यामुळेही नवरेमंडळी चिडतात.

८. बायकोने चाणाक्षपणे, धूर्तपणे किंवा बेरकीपणाने सारखे 'मुळूमुळू' रडू नये, अशी नवरेपार्टीची अपेक्षा असते. हा अपेक्षाभंग झाल्यामुळेही नवरे चिडतात.

९. बायकोने शॉपिंगसाठी भले कितीही पैसा खर्च करावा, पण आपल्याला बरोबर चलण्याचा आग्रह करु नये, असे नवऱ्याला वाटते. असा आग्रह सातत्याने झाल्यामुळेही नवरे चिडतात.

१०. बायकोने बोलावे, पण बडबड करु नये, असे नवऱ्याला वाटते. 'बोलणे' म्हणजे सघंन प्रापंचिक सल्लामसलत व 'बडबड' म्हणजे लष्कराच्या भाकरी भाजणे असे नवरेमंडळींनी स्पष्ट केले आहे.

ही नवरोबांची 'मते' आहेत. आम्ही काढलेले निष्कर्ष नव्हेत, याकडेही शास्त्रज्ञांनी लक्ष वेधले आहे.

## सजावटीचेही बजेट आखावे

घराची सजावट हा प्रत्येकाच्याच हौसेचा भाग असतो, पण सजावट अथवा घराचे नूतनीकरण करताना नियोजन गरजेचं आहे. अन्यथा काम बजेटबाहेर जाऊन विनाकारण मन:स्ताप संभवतो. सुरुवातीला आवश्यक ते बदल लिखित स्वरूपात मांडावेत आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे आणि उपकरणांचे बाजारभाव तपासावेत. यामुळे नेमका खर्च काढणं शक्य होईल. टाईल्स आणि फॅब्रिक या दोन गोष्टींसाठी बराच खर्च होतो. त्यामुळे पहिल्यांदा याची खरेदी करा. त्याचबरोबर रंगाची शेडही निवडा. यामुळे या दोन्हींमधील सुसंगतता राखता येईल. मिक्स अँड मॅच ही देखील सध्याची स्टाईल आहे. मोठ्या डिझाईनबरोबर हलकं डिझाईन, मोठ्या चेक्सबरोबर छोटे चेक्स, प्लेन कापडाबरोबर स्ट्राईप्स असलेलं कापड आदी मार्गानं वैविध्य आणता येतं. घरातील कोपऱ्यांमध्ये आणि रिकाम्या जागेमध्ये इनडोअर प्लांटसाठी जागा ठेवा. सजावटातील हा महत्वाचा भाग ठरतो. नवे आणि धाडसी प्रयोग करण्याआधी टेस्ट घ्या. यामुळे नुकसानीची शक्यता कमी होते.

## उन्हाळ्यात नाश्त्यात खा हे ५ पदार्थ, दिवसभर राहाल फ्रेश आणि हायड्रेटेड

उन्हाळा आला आहे. या ऋतूत लोकांना पचनापासून ते डिहायड्रेशनपर्यंत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा परिस्थितीत, उन्हाळ्यात निरोगी राहण्यासाठी, तुम्ही तुमच्या आहाराची विशेष काळजी घेतली पाहिजे. आरोग्य तज्ञ उन्हाळ्यात जास्त तळलेले आणि मसालेदार पदार्थ खाणे टाळण्याचा सल्ला देतात. जर तुम्हाला उन्हाळ्यात स्वतःला निरोगी ठेवायचे असेल आणि उन्हाळ्याच्या कडक उन्हापासून स्वतःचे रक्षण करायचे असेल तर तुम्ही तुमच्या सकाळच्या नाश्त्यात हलके आणि सहज पचणारे अन्न समाविष्ट केले पाहिजे.



उन्हाळ्यात नाश्त्यात अशा गोष्टी खाव्यात ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि शरीर थंड राहण्यास मदत होते. नाश्त्यात निरोगी अन्न खाल्ल्याने तुम्हाला दिवसभर उत्साही आणि ताजेतवाने वाटेल. आज या लेखात, आम्ही तुम्हाला अशा काही गोष्टींबद्दल सांगणार आहोत, ज्या उन्हाळ्यात नाश्त्यात खाल्ल्यास, तुम्ही संपूर्ण दिवस उत्साही आणि हायड्रेटेड राहाल.

**ओट्सचा वापर** : उन्हाळ्यात ओट्स हा नाश्त्याचा चांगला पर्याय असू शकतो. खरं तर, ते पौष्टिकतेने समृद्ध आहे आणि पचायलाही सोपे आहे. यामध्ये भरपूर फायबर असते, जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. याशिवाय, ते रक्तातील साखर नियंत्रित करण्यास देखील मदत करते. तुम्ही ओट्स दुधात किंवा पाण्यात शिजवून खाऊ शकता. याशिवाय, तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही ओट्समध्ये भाज्या आणि मसाले घालून खिचडी बनवू शकता आणि खाऊ शकता.

**कलिंगडाचा वापर** : उन्हाळ्यात नाश्त्यात टरबूज खाल्ल्याने तुम्ही दिवसभर हायड्रेटेड राहाल. खरंतर, त्यात ९० टक्के पाणी असते आणि इलेक्ट्रोलाइट्स असतात, जे शरीरातील पाण्याची कमतरता दूर करण्यास मदत करतात. शिवाय, त्याचे सेवन दिवसभर शरीराला ऊर्जावान आणि थंड ठेवण्यास मदत करते. याशिवाय, टरबूजाचे सेवन पचनसंस्था सुधारण्यास आणि वजन कमी करण्यास देखील मदत करू शकते.

**अंकुरलेले मूग डाळ** : उन्हाळ्यात तुम्ही नाश्त्यात अंकुरलेली मूग डाळ देखील खाऊ शकता. खरं तर, त्यात व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी, फायबर, प्रथिने, कॅल्शियम, पोटॅशियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, जस्त आणि अँटीऑक्सिडंट्ससारखे अनेक पोषक घटक असतात, जे आरोग्यासाठी अनेक फायदे देतात. याचे सेवन केल्याने पोट बराच वेळ भरलेले राहते, ज्यामुळे तुमचे वजन कमी होण्यास मदत होते. याशिवाय, पचनसंस्था निरोगी ठेवण्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी देखील ते फायदेशीर आहे.


**खजूरचा वापर** : जर तुम्हाला उन्हाळ्यात सकाळी काहीतरी हलके आणि निरोगी खायचे असेल तर तुम्ही खजूर खाऊ शकता. खरंतर, खजूरमध्ये फायबर, लोह, कॅल्शियम आणि पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते, जे शरी-राला ऊर्जा तर देतातच पण पोटही बराच काळ भरलेले ठेवतात. जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेल्या खजूर खाऊ शकता. याशिवाय, तुम्ही केळी शेक किंवा स्मूदीमध्ये खजूर घालूनही खाऊ शकता.

**लापशीचा शिरा** : उन्हाळ्याच्या हंगामात, तुम्ही नाश्त्यात बार्लीचा दलिया खाऊ शकता. ते पचायला खूप सोपे आहे. याव्यतिरिक्त, ते पोट थंड ठेवण्यास देखील मदत करू शकते. खरं तर, बार्लीचा थंडावा असतो. अशा परिस्थितीत, उन्हाळ्यात ते सेवन केल्याने पचनसंस्था निरोगी राहण्यास मदत होते. याशिवाय, त्यात मुबलक प्रमाणात फायबर असते, जे पोट बराच काळ भरलेले ठेवते.

**टिप** : हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## तुम्ही बर्फाचे थंडगार पाणी पिता का? उन्हाळ्यात बर्फाचे पाणी प्यायल्याने पचनक्रिया का मंदावते?

उन्हाळ्यामध्ये अनेकदा आपण बर्फाचे थंडगार पाणी पितो. पण, तुम्हाला माहीत आहे का की उन्हाळ्यात बर्फाचे पाणी प्यायल्याने पचनक्रिया मंदावते किंवा ऋतूंनुसार तुमच्या आतड्यांतील बॅक्टेरिया बदलतात आणि उन्हाळ्यातील काही निरोगी पदार्थ पचवणे त्रासदायक ठरू शकतात? यावर उपायांकडे जाणून घेण्यापूर्वी, उन्हाळ्यातील उष्ण हवामान पचनक्रियेत का व्यत्यय आणते ते समजून घेऊया :



शरीरातील पाण्याती पातळी कमी झाल्याने पचक्रिया मंदावते : शरीरातील पाण्याची पातळी थोड्या प्रमाणातही कमी झाली तर आपले शरीर मोठ्या आतड्यातून पाणी खेचून घेते, परिणामी बद्धकोष्ठता म्हणजे पोट साफ न होण्याचा त्रास होतो.

**उष्णतेमुळे आतड्यातील बॅक्टेरिया बदलतात** : संशोधनातून असे दिसून आले आहे की, अति उष्णता आतड्यातील चांगले बॅक्टिरया कमी करते आणि तुमची रोगप्रतिकारशक्ती कमी करते आणि पचनक्रिया मंदावते.

**थंड पेय किंवा पदार्थ तुमच्या पचनक्रिया मंदावते** : आइस्ड लॅटे आणि स्मुदी ताजेतवाने प्यायला चांगले वाटू शकतात, परंतु ते एंजाइमची क्रिया मंदावू शकतात, ज्यामुळे पचन मंदावते.

**अन्नामुळे होणाऱ्या आजाराचा धोका वाढतो** : उष्ण हवामानात बॅक्टेरिया वेगाने वाढतात, ज्यामुळे सॅलेड, सीफूड आणि उरलेल्या अन्नातून अन्न विषबाधा होण्याची शक्यता वाढते.

**साखर आणि अल्कोहोलचे सेवन वाढणे** : उन्हाळ्यातील कॉकटेल, आईस्क्रीम आणि साखरेचे पेये आतड्यांमध्ये हानिकारक बॅक्टेरिया वाढवतात, ज्यामुळे पोटफुगी आणि जळजळ होते.

**काय करावे?** : उष्णतेमध्ये आतड्यांचे आरोग्य वाढवण्याचे आश्चर्यकारक मार्ग

स्मूदी, सॅलेड किंवा हर्बल आइस्ड टीसाठी बडीशेप, धणे आणि वेलचीसारखे थंडगार मसाले निवडा. जास्त मिरची आणि काळी मिरी अंतर्गत उष्णता आणि आम्लता वाढवते. पचन सुलभ करण्यासाठी कमी प्रमाणात आणि वारंवार जेवण घ्या.

**काय करू नये** : उन्हाळ्यातील सामान्य सवयी ज्या तुमच्या आतड्यांचे आरोग्य खराब करतात

थंड द्रवपदार्थ अन्नातील फॅट्स घट्ट करतात, ज्यामुळे पचनक्रिया मंदावतात. जर तुम्हाला थंड पेय घ्यायचे असेल तर हळू-हळू प्या आणि जेवणापूर्वी किंवा नंतर ते टाळा. उष्णतेमध्ये बॅक्टेरिया वेगाने वाढतात. जर अन्न दोन तासांपेक्षा जास्त काळ बाहेर ठेवले असेल (एक तास ३२ पेक्षा जास्त तापमान असल्यास) तर ते टाकून द्या.

सॅलेड चांगले असले तरी जास्त कच्चे अन्न पचण्यास कठीण असू शकते. हलक्या वाफवलेल्या भाज्या आतड्यांना पचवणे सहज सोपे जाते.

गडद पिवळ्या रंगाची लघवी, तोंड कोरडे पडणे आणि थकवा येणे म्हणजे तुमच्या आतड्याला आधीपासून त्रास होत आहे. तहान लागण्यापूर्वीच भरपूर पाणी प्या.

उन्हाळ्यातील कॉकटेल आणि आईस्क्रीम हानिकारक बॅक्टेरियांना खायला घालतात, ज्यामुळे पोट फुगणे आणि जळजळ होते. त्याऐवजी गोठवलेली केळी किंवा आंब्याचे सरबतसारख्या नैसर्गिक गोड पदार्थांचा वापर करा.

**आतड्यांवरील जलद आरामदायी उन्हाळी उपाय**

एक चमचा जिरेपूड आणि एक चमचा बडीशेप कोमट पाण्यात मिसळा व जेवणानंतर प्या. चिमूटभर काळे मीठ घालून कलिंगड खाल्ल्याने पचन आणि हायड्रेशन सुधारते, परंतु ते कमी प्रमाणात किंवा जर तुमच्या रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त असेल तर शिफारस केल्यानुसार वापरा. आतड्यांसाठी अनुकूल पेय म्हणून नारळ पाणी, पुदिना, काकडी आणि थोडे आले मिसळा.

## छान छान गोष्टी... जिथे आपली शक्ती कामी येत नाही तिथे युक्तीचा वापर करावा

एका गावामध्ये एक राजकुमार राहत होता. तो शूर व निर्भही होता.तो एक दिवस शिकार करण्यासाठी जंगलामध्ये गेला असताना त्याला एक भव्य दिव्य राक्षस दिसतो व त्याला तो आढळतो. राक्षसाला खूप भूक लागली असल्यामुळे तो त्याला खाण्याची धमकी देऊन लागतो व त्याला म्हणतो मी आता तुला खाणार यावर राजकुमार त्या राक्षसाला म्हणतो की मी तुला माझ्या शस्त्राने ठार मारून टाकेन.

राजकुमार सूर असल्याने राक्षस बरोबर खूप काळ लढाई करत होता. राक्षसालाही आश्चर्य वाटले की हा मला घाबरत नाही. कोणत्या राक्षसाने राजकुमारला विचारले की तू मला खरंच घाबरत नाहीस? यावर राजकुमाराने त्याला उत्तर दिले की माझ्या त्याच्या बेंबीमध्ये एक ही अनमोल हिरा आहे तोच माझे शस्त्र आहे. जर तू मला मारून टाकले तरी देखील तू मरणार त्यामुळे मला घाबरायचं काहीच कारण नाही कारण त्या शस्त्राचा वापर मी करू शकतो. मुळे मला घाबरायचं काहीच कारण नाही.

हे राजकुमाराचे म्हणणे राक्षसाला खरे वाटते आणि राक्षस त्या राजकुमाराला सोडून देतो. प्रत्यक्षात राजकुमाराच्या बेंबीमध्ये कोणतेही शस्त्र नसून ते फक्त राजकुमाराचे नाटक होते व त्या वेळचा युक्तीचा प्रयोग होता. ■■■

## आळसापोटी आपल्याला बरेचसे दुष्परिणाम भोगावे लागतात

आळस नावाचा जंतू का एकदा डोक्यात शिरला की, तो शरीरभर त्याचे हातपाय पसरवत सुटतो. एकदा का त्याने संपूर्ण शरीराचा ताबा मिळवला की मग आपण मात्र त्या आळसाचे केवळ गुलाम बनून राहातो. बाकी काही नाही. ही गुलामगिरी झुगारुन नव्या जीवनाला सुरुवात करण्याचा एकच उपाय उरतो आणि तो म्हणजे आळसाला झटकणे. आळसाला आपल्यापासून ताबडतोब दूर करणे.

या आळसापोटी आपल्याला बरेचसे दुष्परिणाम भोगावे लागतात आणि यापूर्वीही ते आपण भोगलेले आहत. वेळच्या वेळी न केलेली किरकोळ गोष्ट एके दिवशी पर्वताएवढी बनून जेव्हा आपल्या समोर येऊन ठाकते तेव्हा, तर आपली काय त्रेधातीरपीट उडते, हे वेगळे सांगायला नको ! एखादी किरकोळ वस्तू जागच्या जागी न ठेवल्याने जरुरीच्या वेळी जेव्हा ती सापडणे अवघड होऊन बसते आणि मग तो काही मनस्ताप सहन करावा लागतो, तो इथे नव्याने वर्णन करण्याची काही एक गरज नाही आणि समजा ती वस्तू नको इतका आटापिटा करुन सापडलीच तरी फायदा काय ? तिला शोधण्यात बहुमोल वेळ वाया घालवून आपले ब्लडप्रेशर वाढवून असा आपला काय फायदा झाला ? केवळ आळसापोटी आपण आपले इतके नुकसान करुन घेतो की पुढील दहा जन्मातही आपण ते भरुन काढू शकत नाही. म्हणून उशिराने का होईना; पण जागे झालात ना ? कारण, हे ही नसे थोडके !

आता मात्र, पुन्हा या आळसाच्या नादी लागू नका. आपण आळस करतो म्हणजे तरी नेमके काय करतो ? कोणीतरी कृती वा काम करण्याचे जाणूनबुजून टाळतो. नाहीतरी आता या कामाची फारशी आवश्यकता नाही. नंतर बघता येईल, असे मनातल्या मनात बोलून आपण ते काम टाळतो आणि वेळ मारुन नेतो; पण जेव्हा केव्हा अगदी त्याच कामाविषयी आपल्याकडे विचारणा होते तेव्हा मात्र पायाखालची वाळू सरकल्याशिवाय राहात नाही. कारण तेवढेच एक काम सोडून देऊन आपण बाकीची कामे पूर्ण केलेली असतात.

म्हणून वेळच्या वेळी काम करुन पुढील कामासाठी तयार राहाणे हाच जीवनात यशस्वी होण्याचा खरा मार्ग आहे. तेवढ्यापुरती आवश्यक आणि त्या त्यावेळची गरज भागण्यापुरती कामं करुन आपण आपल्या प्रगतीला रोखून धरत असतो. आयुष्यात मोठे बनायचे असेल, नाव-प्रसिद्धी मिळवायची असेल, तर आळसाचा कायमचा त्याग करणे एवढा एकच उपाय आपल्याकरिता शिल्लक राहातो. वेळच्या वेळी नेमून दिलेली कामे केली गेली, तर पश्चाताप करण्याची वेळ आपल्यावर कधीच येणार नाही.

आपल्या आळशीपणामुळे आणि त्यातून घडत जाणाऱ्या चुकांमुळेच आपण मागे पडत असतो. सकाळी सहाचा गरज लावूनही आपण गरज लावलेल्या वेळेत उठत नसू, तर हा आपला आळशीपणा आहे. सकाळी लवकर उठायची सवय लावून घेणे म्हणजे आळसाला आपल्या शरीरातून हाकलून काढण्यासारखे आहे. हा आळ जितक्या लवकर आपल्या शरीरातून बाहेर पडेल तितक्या लवकर तुम्ही प्रगतीच्या दिशेने वाटचाल कराल. चला आळसाला आपल्या जीवनातून कायमचाच काढून फेकून देण्याची मोहिम सर्वांनी हाती घेऊ या.


**CHANGE IN NAME**

I declare by this publication about change in my name OLD NAME: VIDYA SAHEBRAO SASANE CHANGE IN TO MY NEW NAME: VIDHYA RAJESH WAVHAL Present address: At Jamkhed, Post Jamkhed, Tal Jamkhed, Dist Ahmednagar, Maharashtra -413201. Mo. 9096634350

**CHANGE IN NAME**

I declare by this publication about change in my name OLD NAME: RAJENDRA SUKADEV VAWHAL CHANGE IN TO MY NEW NAME: RAJESH SUKHADEV WAVHAL Present address: At Jamkhed, Post Jamkhed, Tal Jamkhed, Dist Ahmednagar, Maharashtra -413201. Mo. 9226157477

**ग्रामपंचायत,संतोषनगर,(भाम) ता.खेड,जि.पुणे**
**निविदा नोटीस क्र.सन २०२६-२०२७**

खालील कामांचे सीलबंद निविदा ग्रामपंचायत संतोषनगर ता. खेड, जि.पुणे हे सार्वजनिक बांधकाम व योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून (२ पकिटे पध्दतीने) मागवित आहे. कोऱ्या निविदांतचा नमुना ग्रामपंचायत संतोषनगर ता. खेड जि.पुणे यांजकडून दि. २७/०४/ २०२६ ते ०२/०५/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स. १०.३० ते ४.३०.पर्यंत देण्यात येतील व भरुन पाठविलेले मोहोर बंद निविदा दि. ०२/०५/२०२६ रोजी सायं ४.३० वाजेपर्यंत ग्रामपंचायत .संतोषनगर (भाम) ता.खेड. जि. पुणे मध्ये स्वीकारल्या जातील व ०४/०५/२०२६ रोजी सायंकाळी ४.३०.वाजता किंवा नजीकच्या मासिक सभेत उघडण्यात येतील.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजीत पूर्व गणित रक्कम | कामाचं कालावधी | निधीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | संतोषनगर (भाम)येथे एकविरा कॉलनी मध्ये रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ४,९९,०१३.लक्ष. | ३ महिने | ग्रामनिधी व १५ वा वित्त आयोग. |

टीप १. कोणत्याही दरपत्रके निविदा स्वीकारण्याचा अथवा दरपत्रके निविदा नाकारण्याचा कामे रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.
२. सदर कामांबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबातचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून निविदा उपलब्ध होतील. ३. ठेकेदरांचे कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित दाखला सादर करणे आवश्यक आहे.
४. इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धानाकर्षण डी.डी. ग्रामपंचायत संतोषनगर ता. खेड, जि.पुणे नावाने काढून तो रोखांकित (कास) करुन सदर डी.डी. प्रमाणित दाखला लिफाफा नंबर १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्या शिवाय लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही.

सही/-
सरपंच
ग्रा.पं.संतोषनगर,ता.खेड,
जि. पुणे

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी.
ग्रा.पं.संतोषनगर,ता.खेड,
जि. पुणे

## कलाविश्व

# बिग बॉस मराठी ६' विनर तन्वी कोलते अडकणार लग्नबंधनात



बिग बॉस मराठी ६' विनर आणि अभिनेत्री तन्वी कोलते हिच्या चाहत्यांच्या संख्येत दिवसागणीक वाढ होताना दिसत आहे. बिग बॉसची ट्रॉफी जिंकल्यानंतर तन्वी हिच्या लोकप्रियतेत मोठी वाढ झाली. चाहत्यांची संख्या वाढल्याने तन्वीच्या खासगी आयुष्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. सांगायचं झालं तर, बिग बॉसच्या घरात असताना तन्वी अनेकदा म्हणालेली की, माझ्याबद्दल काहीही बोलू नका, मला बाहेर जाऊन लग्न करायचं आहे असं म्हटलं होतं. आता बिग बॉसच्या घरातून बाहेर आल्यानंतर खुद्द तन्वी हिने लग्न आणि खासगी आयुष्याबद्दल मोठा खुलासा केला आहे.

बिग बॉस मराठी ६' संपल्यानंतर तन्वी कोलते कोणासोबत लग्न करणार? अशा चर्चांनी जोर धरलेला. यावर आता तिने स्पष्ट उत्तर दिलं आहे. तन्वी म्हणाली, मला सर्वात आधी माझ्या करियरसोबत लग्न करायचं आहे मी पहिल्या दिवसापासून म्हटलं होतं की, शोमध्ये अफेअर वैगरे असं काहीही करणार नाही लव्ह अँगल देणार नाही.

तन्वी पुढे म्हणाली, तीन महिन्यांमध्ये कोणाला प्रेम होत नाही मला तर बिलकूल होणार नाही त्यामुळे माझं ठरलेलं होतं की, मी एकटी जाणार आणि एकटी बाहेर पडणार आणि छान खेळणार..', एवढंच नाहीतर, यावेळी तन्वी हिने लग्नाबद्दल देखील मोठं वक्तव्य केलं.

तन्वी म्हणाली, मी कायम एकट गोष्ट सांगत आली आहे आणी ती म्हणजे माझी मम्मी माझ्यासाठी एक चांगला मुलगा बघणार आहे. मला सगळे फटकळ म्हणतात, बिनधास्त म्हणतात पण खरं तर मी खूप जुन्या विचारांची आहे. ज्या मुसासोबत माझी मम्मी लग्न ठरवेल, त्या मुलासोबत मी लग्न करेल काही कोणतंच सिक्रेट नाही.' असं देखील तन्ववी म्हणाली.

बिग बॉस' संपल्यानंतर तन्वी आता कोणत्या प्रोजेक्टमध्ये झळकणार हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे. तन्वी सोशल मीडियावर देखील कायम सक्रिय असते. सोशल मीडियावर तिच्या चाहत्यांची संख्या देखील फार मोठी आहे. चाहत्यांच्या संपर्कात राहण्यासाठी अभिनेत्री कायम स्वत:चे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट करत असते. चाहते देखील अभिनेत्रीच्या प्रत्येक पोस्टवर लाईक्स आणि कमेंटचा वर्षाव करत असतात.

# धीरेंद्र शास्त्रींना रितेशने सुनावलं

बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उपाख्य बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. त्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. नागपूरमधील भारदुर्गा शक्तिस्थळ शिलान्यास कार्यक्रमात ते बोलत होते. धीरेंद्र शास्त्री म्हणाले की, सततची युद्धे आणि संघर्ष करून छत्रपती शिवाजी महाराज थकले होते. त्यांनी थकून आपला मुकुट समर्थ रामदास स्वामींच्या पायाशी ठेवला आणि आता आपल्याला युद्ध करायचं नाही, तुम्हीच हा राज्यकारभार (राजपाट) सांभाळा, अशी विनंती केली. यावरून राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. अशातच अभिनेता रितेश देशमुखने एक्स (ट्विटर) अकाऊंटवर पोस्ट लिहित तीव्र संताप व्यक्त केला आहे. एक शिवप्रेमी आणि शिवभक्त म्हणून हे अमान्य आणि संतापजनक आहे, असं तो म्हणाला.

कोणीतरी येतो आणि आपल्या आराध्य दैवताबद्दल काहीतरी विकृत बरळतो, एक शिवप्रेमी – शिवभक्त म्हणून हे अमान्य आणि संतापजनक आहे. असले चौकटीत अडकवण्याचे फोल प्रयत्न काळाच्या उदरात गडप होतील. पण सह्याद्रीच्या पर्वतरांगा जशा लाखो वर्ष आधी होत्या तसंच ते' एकच नाव करोडो वर्ष भविष्यातही राहील. आणि ते नाव म्हणजे.. प्रौढप्रतापपुरंदरक्षत्रियकुलावतंस सिंहासनाधिश्वर महाराजाधिराज श्रीमंत राजाशिवछत्रपती महाराज,' असं ट्विट रितेशने केलं आहे.

कोणीतरी येतो आणि आपल्या आराध्य दैवताबद्दल काहीतरी विकृत बरळतो, एक शिवप्रेमी–शिवभक्त म्हणून हे अमान्य आणि संतापजनक आहे. असले चौकटीत अडकवण्याचे फोल प्रयत्न काळाच्या उदरात गडप होतील. पण सह्याद्रीच्या पर्वतरांगा जशा लाखो वर्ष आधी होत्या तसंच ते' एकच नाव करोडो वर्ष भविष्यातही राहील.

# उत्तम आरोग्यासाठी आरोग्य उपकेंद्रापासून जिल्हा रुग्णालया'पर्यंत सर्व आरोग्य समित्यांचे पुनरुज्जीवन!

जनप्रवास । प्रतिनिधी

मुबई दि .२६: राज्यातील आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर देखरेख करण्यासाठी व नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या, रुग्ण कल्याण समिती , जन आरोग्य समिती, महिला आरोग्य समिती , ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती या समित्यांची जबाबदारी महत्वाची आहे. सर्वसामान्य नागरिकांना अधिक चांगली व परिणामकारक आरोग्य सेवा देण्यासाठी यासर्व समित्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना विविध योजनांच्या माध्यमातून आरोग्यसेवा दिल्या जातात. या सर्व लोकहिताच्या योजनांची काटेकोर अंमलबजावणी करून नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आरोग्य समित्यांची भूमिका महत्वाची असते. ग्रामीण भागासाठी ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती व शहरी भागासाठी महिला आरोग्य समिती कार्यरत आहे. या समित्या स्वच्छता, पोषण, पाणीपुरवठा, तसेच प्राथमिक आरोग्य सेवा देण्यात महत्वाची भूमिका बजावत असतात.

त्याचप्रमाणे जन आरोग्य समिती व रुग्ण कल्याण समिती या समित्या आरोग्य संस्थांमध्ये रुग्णकेंद्रित सेवा, सेवेची गुणवत्ता व निधीच्या पारदर्शक वापरासंबंधी लक्ष ठेवण्याची भूमिका बजावतात.



ग्रामीण भागासाठी कार्यरत असलेल्या ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा स्वच्छता समिती मध्ये अशासकीय सदस्य म्हणून ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य (प्राधान्याने महिला), बचत गट, तरुण मंडळ, वन सुरक्षा समिती, महिला मंडळ, सामाजिक संस्था, गरोदर व स्तनदा माता, तीनवर्षा पर्यंतचे मुल असलेली माता व शासकिय रुग्णालयात आरोग्य सेवा घेणारे किंवा बरे झालेले दिर्घकालीन आजाराचे रुग्ण यांचा सदस्य म्हणून समावेश असणे अपेक्षित आहे. शहरी भागासाठी कार्यरत असलेल्या महिला आरोग्य समिती ' मध्ये समाजकल्याण, सामाजिक बांधिलकी व नेतृत्व कौशल्य असलेल्या स्थानिक झोपडपट्टी भागातील जास्तीत जास्त वीस महिला सदस्यांचा समावेश अपेक्षित आहे. ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्रा अंतर्गत जन आरोग्य समिती कार्यरत आहे. या समितीमध्ये ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा स्वच्छता समिती अध्यक्ष/महिला सदस्य, महिला बचत गट अध्यक्ष, शालेय आरोग्यदूत, युवाकेंद्र युवा प्रतिनिधी, क्षयरोगमुक्त नागरिक, तसेच एक किंवा दोन मुलानंतर नसबंदी केलेला पुरुष यांचा विशेष निमंत्रित म्हणून समावेश अपेक्षित आहे. शहरी भागातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व नागरी आरोग्यवर्धीनी केंद्र मध्ये कार्यरत असलेल्या जन आरोग्य समितीमध्ये स्थानिक नगरसेवक, नागरी स्वराज्य संस्थेतील आरोग्य समिती अध्यक्ष, नेहरू युवा स्वयंसेवक प्रतिनिधी, एनजीओ प्रतिनिधी, महिला आरोग्य समितीचे अध्यक्ष, शालेय आरोग्य दूत, व दोन प्रतिष्ठित नागरिक यांचा समावेश असणार आहे. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत असलेल्या जन आरोग्य समितीमध्ये जिल्हा परिषद सदस्य, ग्रामपंचायत आरोग्य उपससमिती सभापती /सदस्य, उपकेंद्र जनआरोग्य समितीचे अध्यक्ष, नेहरू युवा, युवा स्वयंसेवक प्रतिनिधी, एनजीओ स्वयंसेवी संस्थेचे दोन प्रतिनिधी, क्षयरोगमुक्त नागरिक, एक किंवा दोन मुलानंतर नसबंदी केलेला पुरुष विशेष निमंत्रित असतो. तसेच अध्यक्ष व महिला सदस्य यांचा आळीपाळीने सदस्य म्हणून समावेश अपेक्षित आहे. जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात कार्यरत असलेल्या रुग्ण कल्याण समितीमध्ये जिल्हा परिषद आरोग्य सभापती, पंचायत समिती सदस्य, एनजीओ प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक, देणगीदार यांचा समिती सदस्या मध्ये समावेश आहे. शहरी भागातील रुग्ण कल्याण समितीमध्ये स्थानिक नगरसेवक व संबंधित कार्यक्षेत्रातील एनजीओच्या प्रतिनिधींच्या समावेश करण्यात आला आहे. यासर्व समित्यांच्या पुनरुज्जीवन करण्याच्या प्रक्रियेत स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच समाजातील सेवाभावी नागरिक यांनी सहभागी व्हावे. आरोग्यसेवा अधिक परिणामकारक होण्यासाठी लोकसहभाग महत्वाचा असून, समित्यांच्या माध्यमातून स्थानिक गरजा ओळखून अंमलबजावणी तसेच त्रुटीबाबत त्वरीत उपाययोजना केल्यास नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देऊन, नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास दृढ होईल असे असे आरोग्य मंत्री म्हणाले.

# फसवणूक व बेकायदेशीर निवडणुकीच्या आरोपांवर रजिस्ट्रारला निर्देश

## दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

जनप्रवास । प्रतिनिधी

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालय यांनी W.P.(C) 5592/2026 (अशुतोष लांडगे विरुद्ध भारत सरकार व इतर) प्रकरणात आदेश देत सोसायटी रजिस्ट्रारला याचिकाकर्त्याच्या अर्जावर कायद्यानुसार योग्य विचार करून निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

याचिकाकर्ते अशुतोष लांडगे हे BRICS CCI च्या गव्हर्निंग बॉडीचे सदस्य असून त्यांनी ७ एप्रिल २०२६ रोजी रजिस्ट्रारकडे अर्ज दाखल केला होता. या अर्जात संघटनेतील आर्थिक फसवणूक, प्रशासकीय अनियमितता तसेच महत्त्वाची कागदपत्रे दडवण्याचे गंभीर



आरोप करण्यात आले आहेत.

लांडगे यांच्या म्हणण्यानुसार, संघटनेची आर्थिक व प्रशासकीय कागदपत्रे गेल्या पाच महिन्यांपासून जाणीवपूर्वक उपलब्ध करून दिली जात नाहीत. वारंवार मागणी करूनही माहिती न देण्यामागे गैरव्यवहार लपवण्याचा हेतू असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तसेच २०१२ नंतर सुधारित एमओएच्या आधारे निवडणूक प्रक्रिया राबवली जात असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. मात्र हा सुधारित एमओए Societies Registration Act, १८६० अंतर्गत नोंदणीकृत नसल्याने अशा निवडणुकीची कायदेशीर वैधता संशयास्पद असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

न्यायालयाने नमूद केले की, याचिकाकर्त्याने आधीच रजिस्ट्रारकडे अर्ज दाखल केला असून त्यावर निर्णय होणे आवश्यक आहे. त्यामुळे रिट याचिका निकाली काढत रजिस्ट्रारला तक्रारींची दखल घेऊन कायद्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

कायदेतज्ज्ञांच्या मते, या आदेशामुळे रजिस्ट्रारवर तक्रारींची चौकशी करण्याची जबाबदारी निश्चित झाली असून यापुढे निष्क्रियता कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरण्यात येणार नाही.

# मुंबई महानगरपालिका शाळांच्या खाजगीकरणाला शिवसेनेचा विरोध

## 'पीपीपी' मॉडेल रद्द करण्याची अंकित प्रभू यांची मागणी

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई महानगरपालिका शाळांच्या खाजगीकरणाला शिवसेनेचा विरोध ; 'पीपीपी' मॉडेल रद्द करण्याची अंकित प्रभू यांची मागणी*. मुंबई, दि . (प्रतिनिधी) : मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचे 'पीपीपी' (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) तत्त्वावर खाजगीकरण करण्याच्या हालचालींना युवा नगरसेवक अंकित प्रभू यांनी जोरदार विरोध दर्शवला आहे. मुंबई महानगरपालिका आपल्या शाळा सक्षमपणे चालविण्यास पूर्णतः समर्थ असताना, खाजगीकरणाचा घाट कशासाठी घातला जात आहे? असा सवाल उपस्थित करत त्यांनी हा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे.

मुंबई महानगरपालिकेची शिक्षण व्यवस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी आणि सक्षम यंत्रणा मानली जाते. गेल्या काही वर्षांत पालिकेच्या शाळांचा दर्जा सुधारला असून, अनेक शाळांनी कात टाकली आहे. अशा परिस्थितीत खाजगी संस्थांच्या हाती शाळांचे व्यवस्थापन सोपवणे म्हणजे सामान्य मुंबईकरांच्या मुलांच्या हक्काच्या शिक्षणावर गदा आणण्यासारखे आहे, अशी भूमिका अंकित प्रभू यांनी मांडली.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी स्पष्ट केले की, मुंबई महानगरपालिकेकडे स्वतःचा मोठा निधी, प्रशिक्षित शिक्षक आणि आधुनिक पायाभूत सुविधा आहेत. पालिकेच्या शाळांमध्ये शिकणारे बहुतांश विद्यार्थी हे कष्टकरी आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील असतात. खाजगीकरणामुळे शिक्षणाचे व्यापारीकरण होण्याची भीती असून, सामान्य विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे पालिकेने स्वतःच्या ताकदीवरच या शाळा चालवाव्यात, खाजगीकरणाचा कोणताही प्रयोग मुंबईत खपवून घेतला जाणार नाही.

अंकित प्रभू यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे खाजगीकरणाच्या मुद्द्यावरून आता प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. सामान्य जनतेच्या हितासाठी आणि महापालिका शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी अंकित प्रभू यांनी घेतलेल्या या भूमिकेचे पालकांकडून आणि शिक्षण तज्ज्ञांकडून स्वागत केले जात आहे.

# आपली बस, आपली सेवा १ मे पासून एसटीचे नवे अभियान

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्राच्या जनजीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीनं, नव्या शिस्तीनं आणि नव्या संवेदनशीलतेनं प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपली बस आपली सेवा या व्यापक अभियानाच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे. त्यानुसार एसटी महामंडळाच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सविस्तर परिपत्रक जारी केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासीसंख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता सेवक' बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे.

# सावरकरांच्या अपरिचित काव्यरचनांनी रंगला भावस्पर्शी कार्यक्रम दीपाली केळकर आणि कांचन सावंत यांचे बहारदार सादरीकरण

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : विनायक दामोदर सावरकर यांच्या अपरिचित काव्यरचनांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणारा अनोखा सांस्कृतिक कार्यक्रम बोरिवली पूर्व येथील जय महाराष्ट्र नगर वसंत व्याख्यानमालेत पार पडला. दूरदर्शनवरील सुविख्यात वृत्तनिवेदिका दीपाली श्रीराम केळकर आणि तरुण गायिका कांचन संतोष सावंत यांनी सावरकरांच्या निवडक कवितांचे गायन व भावार्थ सादर करत उपस्थितांना खिळवून ठेवले.

कार्यक्रमात सावरकरांच्या आठ–नऊ निवडक कवितांचा समावेश करण्यात आला होता. त्यातील काही कडव्यांना स्वत:च




चाल लावून कांचन सावंत यांनी सादर केले. प्रत्येक कवितेचा संदर्भ, आशय आणि सावरकरांचे साहित्यिक योगदान यांचा परिपूर्ण उलगडा दीपाली केळकर यांनी प्रभावी निवेदनातून केला.

स्वतः तज्ञ नसल्याचे नम्रपणे सांगत असतानाही केळकर यांनी केलेली अभ्यासपूर्ण मांडणी, बारकाईने घेतलेल्या नोंदी आणि भावार्थाची सुसंगत उकल यामुळे कार्यक्रम अधिक समृद्ध झाला. सलग अडीच तास चाललेल्या या सादरीकरणात स्वच्छ उच्चार, नेमकी शब्दफेक आणि सहज संवादशैलीमुळे श्रोते अखेरपर्यंत तल्लीन राहिले.

विशेष म्हणजे, कार्यक्रमाच्या अवघ्या अर्धा तास आधीच दीपाली केळकर आणि कांचन सावंत यांची प्रत्यक्ष भेट झाली होती. तरीही दोघींमध्ये उत्तम समन्वय साधला गेला आणि सादरीकरण एकजिनसी भासले.

कार्यक्रमाच्या शेवटी केळकर यांनी सावरकरांचे जीवन राष्ट्रभक्तीचा अथांग सागर असल्याचे सांगत, त्यातील काही अंश जरी आत्मसात करता आले तरी तेच खरे कार्य ठरेल, असे मत व्यक्त केले. तसेच व्याख्यानमालेचे प्रेरणास्थान विजय वैद्य यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या अनुपस्थितीची खंतही व्यक्त केली.सूत्रसंचालन प्रा. नयना रेगे यांनी केले. यावेळी आशा भोसले यांच्या सन्मानाचे स्मरण करत व्याख्यानमालेतर्फे त्यांना सूरस–वरांजली अर्पण करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले.

# अखेर महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेचा बेकायदेशीर प्रशासक रुमी बैरामजी याची हकालपट्टी

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेतील गैरप्रकाराबद्दल अनेक वृत्तपत्रात चर्चा झाली होती. नुकतीच या संदर्भात हायकोर्टात याचिका दाखल झाली होती. या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन एका महत्त्वपूर्ण निकालात, मुंबई उच्च न्यायालयाने (औरंगाबाद खंडपीठ) शुक्रवारी राज्य सरकारला निर्देश दिले की, गेल्या तीन वर्षांपासून बेकायदेशीरपणे ठाण मांडून बसलेल्या प्रशासकाच्या नियंत्रणाखाली असलेल्या 'महाराष्ट्र क्युपंक्चर परिषदे'च्या निवडणुका येत्या तीन महिन्यांच्या आत घेण्यात याव्यात.

मुंबई उच्च न्यायालयाचे (औरंगाबाद खंडपीठ) न्यायमूर्ती अजित कडेतनकर आणि न्यायमूर्ती विभा कंकनवाडी यांचा समावेश असलेले द्विसदस्यीय खंडपीठ, एका ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिकाने–डॉ. लक्ष्मण भीमराव सावंत यांनी ॲड. शरद व्ही. नातू यांच्यामार्फत दाखल केलेल्या–विविध मागण्या करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करत होते. या याचिकेत MCA च्या कामकाजात कथित गंभीर अनियमितता असल्याचा मुद्दा पुराव्यानिशी उपस्थित करण्यात आला होता, तसेच निवडणुका प्रलंबित असताना बेकायदेशीररित्या प्रशासकाचा कार्यकाळ दीर्घकाळापर्यंत सुरू ठेवण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले होते.

याबाबत आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ व मुख्यमंत्री यांनी लक्ष घालणे आवश्यक होते अशा अनेक तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. गेल्या तीन वर्षांत जे काही निर्णय झाले ते अवैध व बेकायदेशीर होते ते आपोआप रद्द होणे आवश्यक आहे अन्यथा प्रकरण आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर शेकले जाऊ शकते. कायद्यातील विविध तरतुदींची अंमलबजावणी करणे हा राज्य सरकारचा प्रयत्न असायला हवा; म्हणजेच, 'महाराष्ट्र ॲक्युपंक्चर उपचार पद्धती अधिनियम, २०१५' (Maharashtra Acupuncture System of Therapy Act, 2015) याची अंमलबजावणी झालीच पाहिजे. सदर अधिनियमाच्या कलम ३ नुसार निवडणुका घेणे आणि परिषदेची स्थापना करणे या बाबींचे राज्य सरकारने काटेकोरपणे पालन केले पाहिजे आणि या प्रक्रियेला अनिश्चित काळासाठी बेकायदेशीरपणे पुढे ढकलले जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले.

सदर याचिकेत MCA च्या कामकाजातील कथित गंभीर अनियमितता व इतर मुद्द्यांबरोबरच, याचिकाकर्त्याने चउ चे माजी अध्यक्ष डॉ. रुमी एफ. बेरामजी यांची नियुक्ती आणि त्यांचा दीर्घकालीन कार्यकाळ याला बेकायदेशीर व मनमानीपूर्ण असल्याचे संबोधले होते; तसेच ही बाब ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीच्या हितासाठी हानिकारक असल्याचेही नमूद केले होते. पाच सदस्यीय वैधानिक संस्थेचे पहिले प्रमुख (मे २०१८ – मे २०२३) म्हणून निवड झाल्यानंतर, डॉ. बेरामजी यांची, (परिषदेचा) कार्यकाळ संपल्यावर, प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

अधिवक्ता नातू यांनी निदर्शनास आणून दिले की, प्रशासकाची ही नियुक्ती निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी केवळ एका वर्षाची 'तात्पुरती व्यवस्था' म्हणून करण्यात आली होती; परंतु नंतर तिचा कार्यकाळ 'वाढवण्यात' आला. तथापि, जवळपास तीन वर्षे उलटूनही, नवीन निवडणुका न घेताच डॉ. बेरामजी यांचे काम सुरूच राहिले. यामुळे वैधानिक नियमांचे पालन आणि प्रशासकीय तत्त्वांचे अनुपालन यांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

डॉ. सावंत यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, डॉ. बेरामजी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आल्यानंतर, परिषदेचे उर्वरित सदस्य प्रभावीपणे बाजूला सारले गेले. यामुळे या नियामक संस्थेची अनिवार्य 'सामूहिक रचना' संपुष्टात आली आणि ६,५०० हून अधिक सदस्य संभ्रमात पडले. युक्तिवादात निवडणुका घेण्यास होणाऱ्या विलंबासाठी 'अपूर्ण मतदार यादी' हे जे कारण दिले जात आहे, ते वरकरणी खरे वाटत असले तरी, निवडणुका लांबणीवर पडण्यास झालेला प्रचंड विलंब पाहता, हे कारण अत्यंत तकलादू (कमजोर) आहे.

अत्यंत खळबळजनक प्रकार म्हणजे डझनाहून कांही क्युपंक्चर महाविद्यालयांना आणि सुमारे दोन डझन 'सातत्यपूर्ण क्युपंक्चर शिक्षण' केंद्रांना दिलेल्या मंजुरीबाबत दबक्याचे आवाजात चर्चा सुरू आहेत. या मंजुऱ्या अत्यंत घाईगडबडीने देण्यात आल्या असून, यात विहित नियमांचे उल्लंघन आणि काही संशयास्पद व्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यातील अनेक संस्था केवळ कागदावरच अस्तित्वात आहेत, किंवा त्यांच्याकडे आवश्यक पायाभूत सुविधा, प्राध्यापक वर्ग आणि इतरू सोयीसुविधांचा अभाव आहे, असा दावाही या याचिकेत करण्यात आला होता.

याचिकेत प्रशासकाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. प्रशासक हे निर्णय एकतर्फी, लहरीपणाने आणि कोणत्याही प्रकारची पारदर्शकता किंवा संस्थात्मक उत्तरदायित्व न बाळगता घेत असल्याचा आरोप यात करण्यात आला आहे, तसेच काही प्रमुख सदस्यांचे 'निवडक लक्ष्यीकरण' केले जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या सदस्यांनी विविध वैध आणि महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे. आश्चर्य म्हणजे भारतातील जागतिक कीर्तीचे सुप्रसिद्ध ॲक्युपंक्चर तज्ज्ञ डॉ. पी. बी. लोहिया यांचेही एकप्रकारे लक्ष्यीकरण करण्यात आल्याने सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. भारतातील ऐंशी टक्के तज्ज्ञांना डॉ लोहिया यांनीच प्रशिक्षित केले असून ॲक्युपंक्चर विषयाची ओळख त्यानीच सर्वप्रथम भारतीयांना करून दिली आहे.

न्यायालयाच्या निकालानंतर तोंडघशी पडलेल्या रुमी बैरामजी समर्थकांनी मात्र रजिस्ट्रार नारायण नवले व प्रशासक रुमी बैरामजी निर्दोष सुटले असा हास्यास्पद प्रचार सुरू केला आहे निकालपत्रात असे कुठेही म्हटलेले नाही. गेल्या तीन वर्षांतील गैरव्यवहार बाहेर येऊ नये याकरिता हा आटापिटा सुरू असावा असे दिसते.

□ मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ संपादक –सिध्दार्थ संजय भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे–४११ ००४ येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com